# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ / आषाढ ४, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### अमरावती येथील आदिवासी विकास विभागामार्फत अभ्यासिका भाड्याने घेण्याच्या करारात अनियमितता झाल्याबाबत

**(१) * ३२८८६ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील राजकमल चौकातील स्थित एका खाजगी मॉलमध्ये आदिवासी विकास विभागामार्फत दरमहा ८ लाख ६८३ रुपये इतक्या अवाजवी दराने अभ्यासिका भाड्याने घेण्याचा करार करताना वित्त विभागाचे शासन निर्णय आणि जागा भाड्याने घेण्याबाबतच्या विहित कार्यपद्धतीचे उल्लंघन झाल्याचे दिनांक ९ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडे निश्चितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ऑनलाईन पोर्टलचा अधिकृत 'कार्यालयीन आयडी' न वापरता बाह्य स्तरावरून किंवा त्रयस्थ यंत्रणेकडून बनावट माहितीच्या आधारे भाडे निश्चितीचा अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाडगेनगर, पलाश गल्ली येथे शासनाची सव्वाशे विद्यार्थी क्षमतेची स्वतःची स्वतंत्र सुसज्ज अभ्यासिकेची इमारत असून माहे डिसेंबर, २०२४ मध्ये पूर्ण तयार असतानाही जाणिवपूर्वक तिचा ताबा घेण्यास दिरंगाई करून खाजगी मॉलमध्ये अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर अभ्यासिकेत विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती केवळ ५ ते १० टक्के असतानाही दिनांक ३१ मार्च, २०२८ पर्यंतचा दीर्घकालीन नियमबाह्य करार करणाऱ्या अधिकारी व शासनावर विद्युत देयके आणि इतर देखभालीचा खर्च लादणाऱ्या संबंधित प्रकल्प अधिकारी व इतर दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी अपर आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ११ मे, २०२६ रोजी चौकशी समिती गठीत केली आहे. सदर समितीने दिनांक २९ मे, २०२६ रोजी अहवाल सादर केला असून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे.

अपर आयुक्त कार्यालयाने वसतीगृहाचे तत्कालीन प्रभारी गृहप्रमुख आणि गृहप्रमुख (आहरण व संवितरण प्रभार) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**जळगाव जिल्हयातील शेतकऱ्यांनी केळीची बनावट लागवड दाखवून पीक विमा घेतल्याबाबत**

**(२) * ३२३६७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयात महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) मार्फत उपग्रह प्रतिमा यांच्या सहाय्याने केलेल्या तपासणीत एकूण ९१ हजार ८८० शेतकऱ्यांच्या ९६ हजार १५७.२०हेक्टर क्षेत्रापैकी केवळ ५० हजार २११.३३ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष केळी पिकाची लागवड केली असून उर्वरीत ४५ हजार ९४५.८७ हेक्टर क्षेत्रावर केळीची कोणतीही लागवड केली नसताना केळी लागवड केल्याचे कागदोपत्री नोंद केल्याची माहिती दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात दिनांक १ नोव्हेंबर ते १५ डिंसेबर, २०२५ या कालावधीत झालेल्या तांत्रिक तपासणीत सुमारे २८ हजार ४७५ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष जमिनीवर केळीचे कोणतेही पीक (लागवड) अस्तित्वात नसल्याचे सॅटेलाईट तपासणीत स्पष्ट झाले असून २७ हजार ४१९ शेतकऱ्यांनी कागदोपत्री केळीची लागवड दाखवून पीक विमा काढला असून त्यामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या बनावट अर्जदारांवर तसेच ऑनलाइन फॉर्म भरणारे सामायिक सुविधा केंद्र चालक आणि एजंट यांच्यावर कारवाई करण्यासह विमा अनुदानाची रक्कम परत मिळविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) होय,

जळगाव जिल्ह्यातील संबंधित पीक क्षेत्राची महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरकडून रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून तपासणी करण्यात आली असता, ४४,०४१.८२ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्षात केळी पीक नसतानाही पीक विमा घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्ह्यात दिनांक १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या तांत्रिक तपासणीत एकुण २७,४१६ अर्जदारांनी केळी पीकाची लागवड नसताना एकूण २८,४७५.०१ हेक्टर क्षेत्रावर पीक विमा घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर कालावधीत झालेल्या तपासणीमुळे विमा हप्ता रकमेत रु.१६४.५८ कोटीची बचत होत आहे.
(३) ज्या सामुहिक सुविधा केंद्रांमार्फत (CSC) वैयक्तिक स्तरावर मोठ्या प्रमाणात अयोग्य विमा प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत, अशा ४८ केंद्राच्या चालकांविरोधात तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यात आले असून आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासाची कार्यवाही सुरू आहे.

तपासाअंती दोषी आढळणाऱ्या केंद्रांचे परवाने रद्द करण्याची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

बनावट अर्ज दाखल केल्याचे उघडकीस आल्यानंतर असे बनावट अर्ज केलेल्या अर्जदारांचे अर्ज विमा पोर्टलवरून रद्द करण्यात आले असून, शेतकऱ्यांनी भरलेला विमा हप्ता प्रती हेक्टरी रुपये ८५०० हा जप्त करून तो केंद्र शासनाकडे जमा केला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींमधील दस्तांची बेकायदा नोंदणी करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत

**(३) * ३२५७४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींमधील ९४१ दस्तांची बेकायदा नोंदणी करुन शासनाच्या १३ कोटी ९१ लाख रुपयांचा मुद्रांक शुल्क महसूल बुडविल्याप्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यामध्ये दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री. आर. बी. दहिफळे, वरिष्ठ लिपिक हे प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग -२ ठाणे क्र. ८ या कार्यालयात कार्यरत असताना त्यानी नोंदविलेल्या दस्तांबाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने नोंदणी उपमहानिरिक्षक, ठाणे यांनी सह दुय्यम निबंधक, ठाणे क्र. ८ या कार्यालयाची दिनांक १ जून, २०२५ ते दिनांक ३० जून, २०२५ या कालावधीत तपासणी करुन सदर तपासणीच्या अहवालामध्ये, अनधिकृत इमारतीतील सदनीकांच्या प्रथम खरेदीचे दस्त हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १ ९६६ अन्वये मनाई करण्यात आलेली असताना आणि नोंदणी अधिनियम १ ९०८ चे कलम  १ ८ (१ ) (क) ची तरतुद स्वयस्पष्ट असताना त्याचे उल्लंघन करुन कोणत्याही कायदेशिर प्रक्रियेचे पालन न करता १० दिवसात ८४२ दस्तांची नोंदणी मोहिम स्वरुपात जाणून बुजून केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून आलेले आहे

सदरची कृती नियमबाह्य असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १ ९८० चे तरतुदीनुसार श्री. दहिफळे यांना शासनाच्या दिनांक १० सप्टेंबर, २०२५ च्या आदेशान्वये शासनसेवेतून निलंबित करण्यात येवून त्यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील आंबा व काजू बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत

**(४) * ३२७०८ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील आंबा व काजू बागायतदार शेतक-यांना बागायतीच्या मजुरीत झालेली वाढ, मशागतीचा प्रचंड मोठया प्रमाणात खर्च, महागडी खते तसेच ३५० कोटी रुपयांची बनावट औषधे शेतक-यांना विक्री केल्याचे माहे एप्रिल २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बागायतदार शेतक-यांनी बनावट किटकनाशके फवारणी केल्यामुळे त्यांच्या हाती उत्पादन न लागल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होऊन ते अडचणीत सापडले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील आंबा बागायतदारांसाठी हेक्टरी १ लाख ७० हजार तर काजू बागायतदारांसाठी हेक्टरी १ लाख २० हजार रुपयांची नुकसानभरपाई मदत देण्यात यावी अशी मागणी बागायतदार शेतक-यांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बनावट किटकनाशक विकणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतक-यांना तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही
(२), (३) व (४) कोकणातील आंबा व काजू बागायतदारांचे नुकसान बनावट किटकनाशके फवारणी केल्यामुळे झाल्याचे दिसून येत नाही. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली व कृषि विभागाच्या संयुक्त क्षेत्रीय पाहणी मध्ये सदरील नुकसान हे तापमानवाढ, हवेतील आद्रता व कडाक्याची थंडी या वातावरणातील बदलामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

कोकण विभागात हवामान बदलामुळे आंबा व काजू पिकातील झालेल्या नुकसानी बाबत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी शासनामार्फत NDRF च्या निकषानुसार पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून त्याच्यानुसार आंबा पिकाचे व काजू पिकाचे बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले असून त्याचा अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## कोकणातील वणव्यामुळे काजू आणि आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(५) * ३२४०७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील वणव्यांमुळे लागलेल्या आगींमध्ये मागील काही महिन्यांत हजारो हेक्टर जंगल जळून खाक झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणात वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे काजू आणि आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे दुर्गम भागात रस्त्याचा अभाव असणे, पाण्याचे स्त्रोत नसणे, फायरलाईनची (सुरक्षित पट्ट्यांची) कमतरता आणि कमजोर नेटवर्क यामुळे आगीवर वेळेत नियंत्रण मिळविणे कठीण ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या वणव्यांमुळे जैवविविधतेचे नुकसान, जमिनीची सुपिकता घटणे, जनावरांच्या चा-याचा तुटवडा तसेच वीजवाहिन्या, घरे आणि पर्यटन व्यवसायावरही परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोकणातील वणव्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच नुकसानग्रस्त काजू आणि आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे अंशतः खरे आहे.

कोकणामध्ये लागलेल्या आगीच्या ११३८ घटना घडल्या असून त्यामुळे १८८०हे. क्षेत्र जळीत झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या आगीच्या घटनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून संबंधितांवर वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(२) वनक्षेत्रातील वनव्यामुळे काजु किंवा आंबा बागांचे नुकसान झाल्याबाबतच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत. काजू व आंबाच्या बागांमध्ये लागणारे वणवे हे मालकी क्षेत्रातील आहेत. वनक्षेत्रामध्ये लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सातत्याने आणि प्रभावीपणे प्रयत्न करण्यात येत आहेत

(३) हे अंशत: खरे आहे.

दुर्गम भागांमध्ये वायरलेस यंत्रणेद्वारे तात्काळ संपर्क साधून आगीवर वेळेत नियंत्रण मिळवण्याचे काम केले जात आहे. तसेच रिअल-टाईम मॉनिटरिंग सिस्टिम साठी आधुनिक तंत्रज्ञान जसे की AI Based Camera चा वापर पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये केला जाते. याव्यतिरिक्त वेळेवर Fire Alerts प्राप्त होण्यासाठी FSI च्या वनअग्नि पोर्टलवर वन अधिकारी व कर्मचारी यांची नोंदणी करण्यात येत आहे. आग विझवण्यासाठी लागणारी साधन सामुग्री खरेदी करण्यासाठी विविध योजनांमधुन निधीची तरतुद करण्यात येत आहे.

(४) वणव्यांच्या/आगीच्या घटनांमुळे जमिनीतील ओलावा कमी होणे, जैवविधतेचा -हास होणे आणि जनावरांच्या चा-याची टंचाई निर्माण होणे या शक्यता नाकारता येत नाहीत. महाराष्ट्र वनविभाग केवळ वनजमिनीशी संबधित कामकाज पाहतो, मालकी क्षेत्राच्या भागाचा त्यामध्ये समावेश होत नाही. त्यामुळे वणव्यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रांसाठी वन पुनरुज्जीवन आराखडा तयार करतांना संबधित विभागाच्या कार्य आयोजनेनुसार (Working Plan) कार्यवाही केली जाते.

(५) काजु व आंबा बागा हया खाजगी मालकी क्षेत्रामधील नुकसान भरपाई देण्याची बाब या विभागाच्या अखत्यारित येत नाही.

कोकणामध्ये वणव्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१ वनवणवा हंगाम चालु होण्यापुर्वी वनक्षेत्रामध्ये जाळरेषा घेण्यात येत आहेत.

२ लागलेल्या आगीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निरक्षक यांची नेमणुक करण्यात येत आहे.

३ वनवणव्याच्या घटनांचे वनगुन्हे नोंद करुन चौकशी करण्यात येत आहे.

४ तसेच १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीमध्ये वनवणवा सप्ताह साजरा करून, गावांमध्ये वनवणवा नियंत्रण व उपाय योजनेचे कार्यक्रमाचे आयोजित करुन, त्याद्वारे लोकांना आगीपासून पर्यावरणाचे होणारे नुकसान, याबाबत माहिती देणेत येते. तसेच चित्रफित दाखविण्यात येते. त्याचप्रमाणे वनवणवा प्रतिबंधक उपाययोजनेचे भित्तीपत्रके तयार करून, गावांमधील सार्वजनिक ठिकाणी भित्तीपत्रके लावणेत येतात.

५. संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा वनवणवा हंगाम कालावधीमध्ये वनक्षेत्राचे संरक्षण करणेकामी मदत घेण्यात येते आहे

६. शासकीय वनांमध्ये वनवणवा हंगाम कालावधीमध्ये वनवणवा लागलेस, सदर ठिकाणी तात्काळ जागेवर जावून, वस्तूस्थितीची खात्री करून, गावातील लोकांच्या मदतीने व अग्निशामक पथकाच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला जातो.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली येथे अवैध गौणखनिज तस्करी करणाऱ्यांनी नायब तहसिलदारावर केलेला प्राणघातक हल्ला

**(६) * ३४६८४ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथे अवैध गौणखनिज तस्करी करणाऱ्यांचे प्रमाण वाढले असून येथील साखर फाटा येथे दिनांक ५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान नायब तहसिलदारांना अर्वाच्य भाषा वापरुन दमदाटी करुन त्यांना ट्रकखाली चिरडण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेनंतरही तक्रार दाखल करण्यास ११ दिवसांचा विलंब झाल्याने प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या सुरक्षितेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) साखर फाटा येथे गौण खनिजाच्या वाहनाद्वारे वाहतूक तपासणी करताना नायब तहसिलदार यांच्या अंगावर वाहन आणण्याचा प्रयत्न केला व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देण्याची घटना घडली. त्यानुषंगाने संबंधित व्यक्तीविरूध्द गडचिरोली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०४५२/२०२६, भारतीय न्याय संहिता (बी. एन. एस) २०२३ च्या कलम १ ३२, ३५२ व ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे स्तरावर अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्याकरिता भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक ५ मे, २०२६ रोजी पोलीस, महसूल व परिवहन विभागाची समन्वय सभा आयोजित करून अवैध गौण खनिज उत्खननावर प्रभावी उपाययोजना राबविण्याकरिता स्विचड्रोन प्रणालीचा वापर व सवयीचे गुन्हेगारांचा शोध घेऊन अशा व्यक्तींवर MPDA नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्नच उदभवत नाही.

-----------------

## ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) सुधारणा विधेयकाला ट्रान्सजेंडर समुदायाचा विरोध असल्याबाबत

**(७) * ३३८८४ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आझाद मैदानावर ट्रान्सजेंडर समुदायाने नुकतेच ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) सुधारणा विधेयकाच्या विरोधात आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विधेयकामुळे ट्रान्सजेंडर व्यक्तींची ओळख पुसली जाईल आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांवर मर्यादा येतील अशी भीती या समुदायाने व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विधेयकातील तरतुदीमुळे ट्रान्सजेंडर व्यक्तींवरील अत्याचार वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ट्रान्सजेंडर व्यक्तींना समाजात सुरक्षितता, सन्मान व समान वागणूक मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) सुधारणा अधिनियम, २०२६ अन्वये ट्रान्सजेंडर व्यक्ती म्हणून ओळख मान्य झालेल्या व्यक्तीस स्वतःच्या समजुतीनुसार लिंग ओळख प्रमाणपत्र मिळविण्याच्या तरतुदीऐवजी ओळख प्रमाणपत्रासाठी वैद्यकीय व प्रशासकीय पडताळणीची व्यवस्था केली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ येथील टिपेश्वर अभयारण्यात रिसॉर्टचे बेकायदा बांधकाम केल्याबाबत**

**(८) * ३२५११ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्य परिसराला पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित केले असून अधिसूचनेनुसार अभयारण्य परिसरात व्यावसायिक बांधकामे रिसॉर्ट, खाणकाम आणि इतर उपक्रमांवर निर्बंध असताना या भागात अनेक रिसॉर्ट आणि पर्यटन प्रकल्प उभारले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या कृषी पर्यटन धोरणानुसार शेती हा मुख्य व्यवसाय असणे आवश्यक असताना काही प्रकल्प पूर्णपणे व्यावसायिक रिसॉर्टप्रमाणे चालविले जात असून कृषी पर्यटनाच्या नावाने पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठांमध्ये माहे मे, २०२६ मध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी पर्यटनाच्या नावाने पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत असून उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठांकडून वन विभागासह जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजाविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून टिपेश्वर अभयारण्यातील अनधिकृत व शासनाच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या रिसॉर्टवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) टिपेश्वर अभयारण्यात पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी केंद्र शासनाने अंतीम अधिसुचना जारी केली आहे. सदर अधिसुचनेनुसार पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात करावयाच्या कामांची प्रतिबंधित, नियमित व मुभा असलेले (Prohibited, Regulated, Promoted activities) अशी वर्गवारी करण्यात आली आहे.त्यानुसार व्यावसायीक रिसॉर्ट, कृषी पर्यटन केंद्र हे नियमित (Regulated activities) वर्गवारीत मोडतात. सदर अधिसुचनेनुसार नियमित वर्गवारीत मोडणाऱ्या कामांना नियमानुसार परवानगी देण्याची अनुमती जिल्हा संनियंत्रण समिती यांना आहे व सदर समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असतात.
(२) सद्य:स्थितीत टिपेश्वर अभयारण्य पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात कच्च्या व पक्क्या स्वरुपाचे बांधकाम झालेले एकूण १७ रिसॉर्ट व कृषी पर्यटन केंद्र आहेत. तसेच एकूण १० रिसॉर्ट व कृषी पर्यटन केंद्र यांचे विरुध्द मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठांमध्ये मे, २०२६ मध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे, अशी वस्तुस्थिती आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत, टिपेश्वर अभयारण्य पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात कच्च्या व पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करणाऱ्या रिसॉर्ट व कृषी पर्यटन केंद्र मालकांना उप वनसंरक्षक (प्रादेशिक) पांढरकवडा यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली असून, सदर नोटीस अन्वये जिल्हा मॉनिटरिंग कमिटीची परवानगी न घेता बांधकाम करू नये व सदर जागेचा वापर व्यावसायिक प्रयोजनार्थ होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच अधिसुचनेनुसार टिपेश्वर अभयारण्य पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे (Eco Sensitive Zone) संनियंत्रण करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या जिल्हा संनियंत्रण समितीची परवानगी न घेता बांधकाम करणाऱ्या रिसॉर्ट व कृषी पर्यटन केंद्र मालकांविरुध्द अधिसुचनेतील तरतुदीनुसार तात्काळ कारवाई करुन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मुद्रांक शुल्काच्या वर्गीकरण प्रक्रियेत पारदर्शकता आणून शासकीय महसूलात वृद्धी करण्याबाबत

**(९) * ३५४८९ श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली, वरळी व अंधेरी या भागांत मुद्रांक शुल्काचे चुकीचे वर्गीकरण करून शासनाचा १० कोटी रुपयांहून अधिक महसूल बुडाल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये 'कॅगच्या (CAG) अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरीवली-२ उपनिबंधक कार्यालयात विकास हक्काच्या कराराचे चुकीचे वर्गीकरण करून ५ टक्क्यांऐवजी केवळ २ टक्के मुद्रांक शुल्क आकारल्यामुळे शासनाचे १०.५० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथील मालमत्तेचे बाजारमूल्यापेक्षा कमी मूल्यांकन करणे आणि पिंपरी-चिंचवडमधील हवेली-५ कार्यालयात भाडेपट्टा कराराचे चुकीचे वर्गीकरण करून शासकीय निधीचा अपव्यय केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंधेरी व पालघर येथील मुद्रांक शुल्काच्या आकारणीत अनियमित सवलती देऊन शासनाच्या महसूलाचे नुकसान झाल्यामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह मुद्रांक शुल्काच्या वर्गीकरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सह दुय्यम निबंधक मुंबई शहर-III कार्यालयातील विकसन करारनामा दस्त क्र.१ १ ७४३/२०२१ हा मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी अभिनिर्णीत केला असून लेखा तपासणी पथकाच्या आक्षेपाच्या अनुषंगाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या ५३-अ अंतर्गत पडताळणी करून संबंधित मिळकतीचे मुल्यांकन निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार देय मुद्रांक शुल्काची रकम रू.२५,१ १ ,८२५/- इतकी वसूली करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड मधील हवेली क्रमांक ५ येथील दस्त क्र.८४७९/२०२१ हा लिव्ह अँड लायसन्सचा नसून भाडेपट्याचा असलेबाबत महालेखापाल, नागपूर यांनी आक्षेप नोंदविला आहे. सदर दस्तामध्ये कमी भरलेले मुद्रांक शुल्क रू.२९,४१, ६१ २/- व नोंदणी फी रू.२९,०००/- इतकी आहे. सदर अहवाल नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाने अमान्य केला असून सदरचा परिच्छेद महसूली जमा अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येवू नये असा अनुपालन अहवाल महालेखापाल, नागपूर यांना सादर केला आहे.

(४) हे खरे नाही.

सह दुय्यम निबंधक अंधेरी-१ कार्यालयातील विकसन करारनामा दस्त क्र.१ १ ००९००/४१ ३/२०२० हा मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांनी अभिनिर्णीत केलेला आहे.

सदर दस्तामध्ये Article २५ (a) अंतर्गत येणारा slump sale म्हणून योग्य प्रकारे वर्गीकृत आहे; मात्र दिनांक २९.०८.२०२० च्या अधिसूचनेनुसार देण्यात आलेली मुद्रांक शुल्क सवलत चुकीने लागू करण्यात आली आहे, कारण ती केवळ Article २५ (b) साठीच लागू आहे, त्यामुळे महालेखापाल नागपुर यांचा आक्षेप योग्य आहे.

सदर प्रकरणात कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु. ७७,२१ ,४९६/- हे शासन जमा करणेबाबत कलम ५३A अंतर्गत आदेशित करण्यात आले होते.

सदर रक्कम गैरअर्जदार यांचेकडुन वसुल करण्यात आलेली आहे.

पालघर मध्ये अशी बाब आढळून आलेली नाही.

(५) आक्षेपित मुद्रांक शुल्काच्या वसुलीच्या अनुषंगाने कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील बौध्द समाजासाठी लागू केलेले नमुना क्रमांक ७ चे जात प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत**

**(१०) * ३३६१२ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फक्त बौध्दांसाठी लागू केलेले नमुना क्रमांक ७ चे नुकसानकारक जात प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केल्याने या प्रकरणाची सन १९९१ सालची मूळ नस्ती मंत्रालयातून गहाळ झाल्याची कबूली माहिती अधिकाराच्या उत्तरात दिल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नमुना क्रमांक ७ चे जात प्रमाणपत्र रद्द करुन केंद्र सरकारच्या नमुना क्रमांक ६ प्रमाणे प्रमाणपत्र लागू करण्याची मागणी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे माहे एप्रिल, २०२६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नस्तीचा शोध तातडीने घेण्याबाबतचे आदेश दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (मावक) यांनी देऊनही अद्यापही उक्त नस्तीचा शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी गहाळ करण्यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

सदर नस्ती गायब झालेली नसून, सदर नस्ती सुमारे ३५ वर्षे इतकी जुनी असून कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याने मंत्रालयीन अभिलेख कक्षास सदर नस्ती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेली नस्ती सन १९९१ मधील, म्हणजेच सुमारे ३५ वर्षे इतकी जुनी असून कार्यासनातील उपलब्ध अभिलेखांचा शोध घेतला असता सदर नस्तीबाबत कोणताही अभिलेख/दस्तऐवज आढळून आलेला नाही. तथापि, सदर नस्ती उपलब्ध करुन देण्याकरीता मध्यवर्ती अभिलेख कक्ष, मंत्रालय यांना कळविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (टीआरटीआय) आदिवासी विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षण वर्ग अद्याप सुरु न केल्याबाबत**

**(११) * ३३५७२ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (टीआरटीआय), केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस) यासारख्या विविध स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम आदिवासी विद्यार्थ्यांकरिता राबविले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विविध प्रशिक्षणासाठी राज्यातून १ लाख ३ हजार ७४२ विद्यार्थ्यांनी अर्ज केले असून माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०२५ या कालवधीत झालेल्या सीईटीमध्ये ७२ हजार ९७३ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली असून माहे जानेवारी, २०२६ मध्ये त्याचा निकाल लागून ४ महिने झाले तरी प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या नियोजन शून्य कारभारामुळे आणि अधिकाऱ्यांच्या संथ कारभारामुळे राज्यातील हजारो आदिवासी विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचे भवितव्य धोक्यात असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत आठ महिन्यापासून या प्रक्रियेत अडकून पडलेल्या व पुण्यासारख्या शहरात खानावळीचा खर्च न परवडणाऱ्या विद्यार्थ्यांना टीआरटीआय संस्थेकडून काहीच प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या दिरंगाईसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (टीआरटीआय) आदिवासी विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) हे खरे आहे.
(२), (३),(४),(५) व (६) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेद्वारा ऑनलाईन सामायिक चाळणी परीक्षांची गुणवत्ता व प्रतिक्षा यादी दिनांक १६ डिसेंबर, २०२५ व दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी आदिवासी

संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ते दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत निवड झालेल्या उमेदवारांना पूर्व प्रशिक्षण योजनानिहाय त्यांच्या इच्छेनुसार प्रशिक्षण संस्थांच्या निवडीकरीता ऑनलाईन विकल्प पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आले. तद्नंतर दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक ९ मार्च, २०२६ यादरम्यान उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणीची (Original Document Verification) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पुढील सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन दिनांक ४ मे, २०२६ पासून युपीएससी नागरी सेवा-परीक्षा, एमपीएससी-राज्यसेवा अराजपत्रिक, न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, PSI/STI/ASO व गट क सेवा परीक्षा, बँक (IBPS), रेल्वे, एल. आय. सी. व लिपिक वर्गीय पदांकरीताच्या परीक्षा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (TET), GRE/TOEFL/IELTS/GMAT व परकीय भाषा स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले.

प्रशिक्षण कार्यक्रमास विलंब होत असल्याबाबत शासनाकडे प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाकडून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला वेळावेळी कळविण्यात आलेले असून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडील वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनाकडे प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे. त्यानुसार विविध स्पर्धा पूर्व प्रशिक्षण योजनेत निवड केलेल्या काही प्रशिक्षण संस्थाकडून आर्थिक व प्रशासकीय अनियमितता होत असल्याच्या तक्रारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेद्वारा समित्या स्थापण करण्यात आल्या होत्या. या समित्यांचा अहवाल प्राप्त होण्यास काही कालावधी लागल्याने तसेच काही संस्थाकडून CCTV Access प्राप्त होण्यास विलंब झाल्याने प्रशिक्षण कार्यक्रम सुरु होण्यास विलंब झाला.

-----------------

## मुंबई उपनगर जिल्ह्यातील अनेक दिपगृह नादुरुस्त असल्याबाबत

**(१२) * ३२७४४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील मढ, मार्वे, मनोरी व गोराई या मासेमारी गावांमध्ये बोटींना दिशा देण्यासाठी असलेली अनेक दीपगृहे कार्यरत नसल्यामुळे मच्छीमारांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोराई समुद्र किनाऱ्यासमोरील तीन दीपगृहांच्या दुरुस्तीचे तसेच दोन नवीन दीपगृह उभारण्याचे काम शासनामार्फत हाती घेण्यात आले असून त्यासाठी पर्यावरण विषयक आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मनोरी कोळीवाडा येथील दोन दीपगृहांच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सुरू असून ते अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मढ, मार्वे, मनोरी व एस्सेलवर्ल्ड परिसरातील रो-रो जेट्टी व संबंधित सुविधा प्रकल्पापैकी काही कामे प्रलंबित असून मनोरी येथील नवीन रो-रो जेट्टीचे काम माहे मार्च, २०२६ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन शासनाने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, संबंधित जेट्टीपर्यंत जाणारे रस्ते अपुरे व असुविधाजनक असल्यामुळे नागरिक व पर्यटकांना त्रास होत असून उक्त रस्त्यांची दुरुस्ती व सुसज्जीकरणाबाबतचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू सर्व प्रलंबित कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून मच्छीमार, स्थानिक नागरिक व पर्यटकांना सुरक्षित व सुकर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

तथापि, गोराई मच्छिमार सहकारी संस्थेच्या मागणीनुसार गोराई बंदरातील दोन दिशादर्शक खांबांवरील नादुरुस्त दिवे दुरुस्त करून पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहेत.
(२) व (३) हे खरे आहे.

मनोरी व गोराई येथे नवीन दीपस्तंभ उभारणीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) हे अंशत: खरे आहे.

मनोरी येथील रो-रो जेट्टीचे ७७ % काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम माहे सप्टेंबर, २०२६ पूर्ण होणार आहे.
(५) हे खरे नाही. सद्यस्थितीत आर/मध्य विभागाच्या हद्दीतील गोराई जेट्टी करीता जाणारे दोन्ही बाजूकडील रस्ते सुस्थितीत आहेत.

तसेच, मढ, मार्वे, मनोरी व गोराई जेट्टीपर्यंत जाणारे रस्ते दुरुस्ती/सुसज्जिकरण करण्याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/पश्चिम कार्यालयाकडून प्रमुख अभियंता (रस्ते) विभागास पाठविण्याचे प्रस्तावित आहेत.
(६) मनोरी व गोराई येथील दीपस्तंभ उभारणीचे काम प्रगतीपथावर असून माहे फेब्रुवारी, २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच मढ येथील काशा खडक, बारी खडक व तनाली खडक येथे दीपस्तंभ उभारण्याची कामे प्रस्तावित आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेत वाढ करण्याबाबत

**(१३) * ३२४३२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनींचा पट वाढविणे व त्या शैक्षणिक दृष्ट्या या शाळाकडे अधिकाधिक प्रवेशित होण्यासाठी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी २ कोटी १६ लाख २१ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मागील ३ वर्षांपासून अद्याप प्रलंबित असून सुमारे ११,७४६ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ३ शिष्यवृत्ती योजनांसाठी केवळ ३० लाखांची तरतूद करण्यात आली असून, प्रत्यक्षात २ कोटी १६ लाख २१ हजार रुपयांच्या निधीची आवश्यकता असताना निधीअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सफाई व आरोग्यदृष्ट्या धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, तसेच सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचे शेकडो विद्यार्थी अद्यापही लाभाच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेद्वारे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थिनींना प्रतिमहा ६० रुपये तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थिनींना प्रतिमहा १०० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत असून सदर शिष्यवृत्तीत सन २००७ पासून कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त शिष्यवृत्तीत महागाई निर्देशांकानुसार वाढ करून त्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती अंतर्गत ६३९३ विद्यार्थिनींना रु.५४.५२ लाख इतकी शिष्यवृत्ती प्रलंबित आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता ३ शिष्यवृत्ती योजनांकरिता राज्यस्तरावर रु.४१२.३५ लाख इतका खर्च झालेला आहे. त्यापैकी नागपूर जिल्हयासाठी रु.११.११ लाख इतक्या शिष्यवृत्तीचा लाभ प्रदान केलेला आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत सदर योजनांअतर्गत नागपूर जिल्हायातील २२३० विद्यार्थ्यांना लाभ अदा करण्यात आला आहे.
(५) व (६) हे खरे आहे.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतील शिष्यवृत्तीच्या रकमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याबाबत स्थापन केलेल्या समितीचा अहवाल

**(१४) * ३३७२१ श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात न्यायमूर्ती बदर

समितीने संशोधन अहवाल शासनास सादर केला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल अद्यापपर्यंत सार्वजनिक करण्यात आला नसल्यामुळे या अहवालावर हरकती व उपसूचना कशा नोंदवायच्या हा प्रश्न अनुसूचित जातीच्या नागरिकांना पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त अहवालानुसार राज्यातील अनुसूचित जातींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन कोणती विशेष पावले उचलणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमधील अत्यंत मागासलेल्या आणि दुर्बल घटकांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने मा.न्यायमूर्ती श्री.अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने शिफारशींसह अहवाल शासनास दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी सादर केला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

बदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर मा.मंत्रिमंडळाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही. तथापि, अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या विषयाबाबत सामान्य जनतेला अर्ज/निवेदने सादर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI), पुणे यांच्या कार्यालयीन स्तरावर ई-मेल आयडी तयार करण्यात आलेला असून सदर ई-मेल वर नागरिकांमार्फत अर्ज/निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(३) व (४) मा.न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर मा.मंत्रिमंडळाने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून संबंधितांची सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार संबंधितांना BARTI, पुणे कार्यालयाच्या ई-मेल आयडी वर अर्ज/निवेदने सादर करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या विषयाबाबत प्राप्त झालेल्या अर्ज/निवेदनांच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत शासनास अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर शासन स्तरावरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागातील सेंट्रल किचन व सेमी सेंट्रल किचनच्या निविदा प्रक्रियेत अपात्र संस्थेला कंत्राट दिल्याबाबत

**(१५) * ३५८०२ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन व आहार पुरवठा करण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (आदिवासी) ठाणे यांनी सेंट्रल किचन आणि सेमी सेंट्रल किचनसाठी दिनांक ९ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निविदा प्रसिद्ध केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा सादर करणारी संस्था कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय विभागाकडून काळ्या यादीत नसावी तसेच सदर संस्था कोणत्याही गैरप्रकार किंवा गैरवर्तनासाठी दोषी आढळलेली नसावी अशी अट निविदेत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था (नाशिक) या संस्थेने सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत जिल्ह्यातील विविध उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या दैनंदिन आहार पुरवठा देयकामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या दरम्यान सिद्ध झाले असूनही सदर संस्थेला अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील भागदरी येथील शासकीय आश्रमशाळेचे आहार पुरवठ्याचे कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या संस्थाचालकांनी अपात्र संस्थेला दिलेले कंत्राट रद्द करून पारदर्शकतेसाठी फेरनिविदा प्रसिद्ध करण्याची मागणी दिनांक ५ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला भगदरी (ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार) या आश्रमशाळेचे आहार पुरवठ्याचे कंत्राट देण्याऱ्या संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यावर व संबंधित संस्थेच्या संस्थाचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) होय

(२) होय

(३) श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था (नाशिक) यांनी निविदा अटी शर्तीमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांमध्ये “Non Blacklisting’ बाबत नोटरी केलेले घोषणापत्र (declaration) सादर केले असून त्यांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या आधारे त्यांना तांत्रिकदृष्ट्या पात्र करण्यात आले असून त्यांनतर भगदरी येथील सेमी सेंट्रल किचनसाठी त्यांचा देकार निम्नतम आल्याने स्पर्धात्मक पद्धतीने त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) नाही. तथापि, दि.यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित, नाशिक या सहभागी निविदाकाराने तांत्रिक मूल्यांकन अहवाल अंतिम झाल्यानंतर दिनांक १ ऑगस्ट, २०२५ च्या पत्रान्वये त्यांना ‘तांत्रिकदृष्ट्या पात्र करणे अथवा निविदा प्रक्रिया रद्द’ करण्याची मागणी केली होती. तसेच त्यांनी स्वतंत्र ९ निविदांच्या अनुषंगाने ९ स्वतंत्र रिट याचिका मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करुन निविदांच्या तांत्रिक मुल्यांकनाला आव्हान दिले होते. मा. उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशान्वये सर्व याचिका फेटाळल्या आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ करण्याबाबत

**(१६) * ३३०१८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.समाधान आवताडे**

**(पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत मजुरी दरात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी कोणतीही वाढ करण्यात आली नसून मजुरी दर ३१२ रुपये इतका कायम ठेवण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगाच्या मजुरी दरात वाढ झाली नसल्यामुळे ग्रामीण भागातून विशेषतः आदिवासी पट्ट्यातून शहरांकडे मजुरांचे स्थलांतर वाढले असून यामुळे वेठबिगारी आणि मुलांच्या शिक्षणाचा (शाळाबाह्य मुले) प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढती महागाई, खाजगी क्षेत्रातील तुलनेने अधिक मजुरी, शेतीकामातील वाढलेले दर तसेच मनरेगा योजनेच्या मजूरी दरात वाढ न झाल्यामुळे ग्रामीण मजुरांचा या योजनेकडील कल कमी झाला असून ग्रामीण अर्थव्यवस्था व रोजगारनिर्मिती वर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर जिल्ह्यात एकूण ३ लाख १३ हजार ३४८ जॉबकार्डधारक कुटुंबे असून प्रत्यक्षात जिल्ह्यातील १३ तालुक्यांत ४८६ कामे सुरू असून सोलापूर जिल्ह्यातील ६५ कामांवर केवळ ३०८ मजूर उपस्थित आहेत व लातूर जिल्ह्यात १७३ कामे सुरू असून मजूर क्षमता २७ हजार असताना केवळ ५ हजर मजूर कामे करीत आहेत त्यामुळे अत्यल्प मजूर उपस्थितीमुळे विकासकामांची गती मंदावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच जालना जिल्ह्यात ग्राम रोजगार सहाय्यकांच्या कामबंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये मस्टर रोल बंद असून, त्यामुळे मनरेगा अंतर्गत सुरू असलेली अनेक विकास कामे अपूर्ण अवस्थेत असून नंदुरबार येथील शहादा (नंदुरबार) तालुक्यातील मजुरांची तीन महिन्यांची मजूरी थकली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ करून प्रलंबित मजुरी तात्काळ अदा करणे तसेच नागपूर, सोलापूर, लातूर जिल्ह्यात ग्रामपंचायतीमार्फत शेततळे, विहीर खोदकाम, वृक्षारोपण व अन्य मनरेगा कामांना गती देऊन ग्रामीण भागातील अधिकाधिक कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देणे, तसेच ग्राम रोजगार सहाय्यकांच्या आंदोलनावर तोडगा काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले :** (१) सन २०२६-२७या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनामार्फत अद्यापपर्यंत मजुरीदर सुधारित करण्यात आला नसल्याने मागील आर्थिक वर्षाच्या मजुरीदराप्रमाणे मजुरी अदा करण्यात येत आहे.

(२) शासनस्तरावर अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील १,२७,२०३ कामांवर ८,६२,९३१ मजुर कार्यरत आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे अंशतः खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वित्तीय वर्ष २०२६-२७ मध्ये जालना जिल्ह्यात मजुरांनी केलेल्या कामाच्या मागणीनुसार काम उपलब्ध करुन देण्यात आले असून १०,७०,४६४ मनुष्यदिन निर्मिती झाली आहे. तसेच, नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील मजुरांची दिनांक २१ मे, २०२६ ते १६ जून, २०२६ या कालावधीतील रु. २२८.६९ लाख मजुरी प्रलंबित असून, तिचे देयक प्रचलित पद्धतीनुसार अदा करण्यात येत आहे.

(६) केंद्र शासनामार्फत दरवर्षी राज्यनिहाय मजुरीदर निश्चीत करण्यात येतो. मनरेगा योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत १०० दिवसांच्या आतील मजुरी दिनांक १९ मे, २०२६ पर्यंत अदा करण्यात आली आहे. राज्यशासनामार्फत १०० दिवसांवरील मजुरी अदा करण्याकरीता आवश्यक निधी वितरीत करण्यात आला आहे. मनरेगा ही योजना मागणी प्रधान असून योजनेंतर्गत मागणीनुसार मजुरांना कामे उपलब्ध करुन दिली जातात. ग्राम रोजगार सहाय्यकांच्या मानधनाबाबत पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत

**(१७) * ३२३९४ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.किसन वानखेडे (उमरखेड), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुहास बाबर (खानापूर), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड),**

**श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नाशिक, कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, अहिल्यानगर, सांगली, संभाजीनगर व बीड यासारख्या अनेक जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये झालेला अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारा, बदललेले हवामान व इतर नैसर्गिक आपत्ती, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानीसह शेतमाल, घरे, जनावरे, पीक, फळ बाग व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पशुधन व जनावरांचा मृत्यू इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून पावसामुळे वाळवणीसाठी ठेवलेल्या हळदीचे नुकसान, बऱ्याच ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे दगावल्याची नोंद प्रशासनाकडे प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नैसर्गिक आपत्तीमुळे महसूल व कृषी विभागाकडून पाहणी करून त्यानंतर पंचनाम्याची प्रक्रिया सुरू न झाल्यामुळे तसेच संबंधित पथके गावांमध्ये अनुपस्थित असल्याने पंचनामे पूर्ण झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून मदत निधी वितरणासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, पिक विमा योजनेची व्याप्ती वाढविणे (DBT) थेट लाभ हस्तातंरण पद्धतीने मदत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी शासनाने पंचनामे पूर्ण करण्याबाबत जिल्हा प्रशासनास विशेष निर्देश दिले आहेत काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हवामानाच्या अंदाजाची अचूकता सुधारण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक मदत, पीकविमा, जनावरांच्या नुकसानीची भरपाई देणे, मृतांच्या वारसांना मदत तसेच वीज पुरवठा पुर्ववत व वीज प्रतिबंधक यंत्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय

(२) अशंत: खरे आहे, हळदीचे नुकसान झाल्याची बाब आढळुन आलेली नाही. काही ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे जिवित हानी झाली आहे.

(३), (४), (५) व (६) बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करुन पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डिबीटी प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्यहानी झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना तातडीने मदत करणे शक्य व्हावे. तसेच पशुहानी झाल्यास पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना मदत वाटप करणे शक्य व्हावे, म्हणून (-) उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीची नोंद घेऊन महावितरणाकडून तात्काळ दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येते.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंअतर्गत शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये नागरिकांचे मृत्यू व शेत पिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(१८) * ३३८५६ श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सुमित वानखेडे (आर्वी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नागपूर, सांगली, ठाणे, गडचिरोली, अमरावती, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, सातारा या जिल्ह्यात वाघ, बिबटे, हत्ती, रोही इत्यादी वन्य प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यात नागरिकांचा मृत्यु व शेतकऱ्याचे पशुधन व शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांगरुड (ता.भिवापूर, जि.नागपूर) येथे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान वाघाच्या हल्ल्यात महिला जखमी झाली असून तसेच चिखलापार (ता.भिवापूर, जि.नागपूर) येथे शेतातील गुरांची वाघाने शिकार केल्याने संबंधित शेतकऱ्यांचे जवळपास ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर, कसारा (जि. ठाणे) तालुक्यातील डोळखांब वनपरिक्षेत्र हद्दीत कळभोंडे जवळील लाद्याच्या वाड्यात रानमेवा गोळा करणाऱ्या आठ वर्षीय मुलाचा दिनांक २१ मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलनाचा हंगाम सुरु असताना दिभना, अमिर्झा व चुरचुरा वनपरिक्षेत्रात हत्तींच्या कळपाने धुमाकूळ घालून शेतकऱ्यांच्या मका आणि भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वरूड (जि.अमरावती) तालुक्यातील गावांमध्ये रोही (निलगाय) या जनावराने संत्र्याच्या झाडाचे पान, फांद्या व झाडाची साल खाल्ल्यामुळे ते झाड जिवंत राहत नाही परिणामी शेतकऱ्यांना १००% नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतक-यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील जंगलामध्ये झुडपी जंगल गवतवर्गीय वनस्पती व खुरटी झाडे मोठया प्रमाणात तोडून जंगल एकीकरण केल्याने वन्यजीवांचा निवारा अन्नसाखळी धोक्यात आली असून परिणामी ससा, चितळ हरीण इत्यादी प्राणी भक्ष्य अभावी वाघ, बिबटया सारखे लोकवस्तीकडे वळत आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वन्य प्राण्याचा हल्ल्यात जखमीं व मृत कुटूंबियांना आर्थिक मदत देणे, बाधित शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीच्या निकषानुसार तातडीने सानुग्रह अनुदान किंवा आर्थिक मदत देणे तसेच भविष्यात हत्तींच्या कळपाचा शिरकाव रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे रक्षण करण्यासाठी सौर कुंपण (Solar Fencing) किंवा इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे तसेच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

राज्यात विशेषत: नागपूर, सांगली, ठाणे, गडचिरोली, अमरावती, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, नाशिक चंद्रपूर या जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२६ मध्ये वाघ, बिबट, हत्ती, रोही वन्य प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यात ७ नागरिकांचा मृत्यु झाला असून, रु. १.७५ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. पिक नुकसानीची १६६१ प्रकरणे झाली असून, रु. १.९३ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. पशुधन हानीची ७७२ प्रकरणे झाली असून रुपये १.३१४५ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) नागपूर वनविभागाच्या दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रामध्ये भिवापूर तालुक्यातील मौजा-मांगरूड या गावात दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान वाघाचे हल्ल्यात महिला जखमी झाल्याची घटना घडलेली नाही. तसेच मौजा-चिखलापार येथील शेतशिवारात वाघाच्या हल्ल्यात श्री. निलेश रामभाऊ खोंडे यांच्या मालकीच्या बैलाचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी घडलेली असून, मृत बैलाची रु. ७८०००/- नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

शहापूर वनविभाग अंतर्गत वनपरिक्षेत्र डोळखांब येथे दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी परिमंडळ, हिंगलोद, नियतक्षेत्र कळभोंडे मध्ये कु. कृष्णा भागा आगिवले वय-८ वर्ष हा मुलगा आपल्या कुटुंबातील व्यक्तींसोबत जंगलामध्ये आंबे गोळा करण्यासाठी गेला असता सकाळी १०.३० वाजताचे दरम्यान त्याचेवर बिबट वन्यप्राण्याने हल्ला करुन ठार केल्याची घटना घडली आहे.

(४) हे खरे आहे.

दिभना, अमर्झा व चुरचुरा या गावांमध्ये माहे जानेवारी ते मे, २०२६ पर्यंत वन्य प्राण्यांकडून झालेली पिक नुकसान, पशुधन हानी, मनुष्य जखमी तसेच त्या अनुषंगाने अदा केलेली नुकसान भरपाईची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

दिभना गावात शेतपिक नुकसानीची २५ प्रकरणे झाली असून, रु.२६,१४४/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

अमिर्झा गावात शेतपिक नुकसानीची ५३ प्रकरणे झाली असून, रु. ५,१३,४२१/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. पशुधन हानीची ०५ प्रकरणे झाली असून, रु. १,१५,०००/- अदा करण्यात आले आहे. तसेच १ व्यक्ती गंभीर जखमी झाला असून, रु, ५,००,०००/- अदा करण्यात आले आहे.

चुरचुरा गावात शेतपिक नुकसानीची ०९ प्रकरणे झाली असून, रु.१६,२००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. तसेच पशुधन हानीची ०५ प्रकरणे झाली असून, रु. ४२,३५१/- अदा करण्यात आले आहे.

(५) महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान भरपाई यांकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अन्वये संबंधितांना नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(६) वन्यप्राणी मानवी वस्तीकडे येऊ नये यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• वन्यप्राणी वाघ/बिबट यांना मुबलक प्रमाणात तृण भक्षक प्राण्यांची शिकार करता यावी याकरीता वन्यप्राण्यांचे वास्तव्य असलेल्या क्षेत्रात गवत कुरण विकासाची कामे केली जातात.

• वनक्षेत्रात वन्यजीवांना पाणी उपलब्ध होण्याकरीता जल व मृद संधारण अंतर्गत वनतलाव तयार करण्यात आले आहेत.

(७) वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या नुकसानाकरिता महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान भरपाई यांकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अन्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत वनक्षेत्रालगत शेती असलेल्या शेतकऱ्यांना सौर कुंपनाचे वाटप करण्यात येते.

• वनविभागामार्फत नागरी वस्तीकडे वाढता वन्यप्राण्यांचा वावर आटोक्यात आणण्यासाठी रेस्क्यु टीम तयार करण्यात आलेल्या आहेत. तसेच वन्यप्राण्यांच्या हालचालीचे निरीक्षण करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी व बचाव साहित्य उपलब्ध करण्यात आले आहे.

• जिल्हा व्याघ्र कक्ष स्थापन करण्यात आला असून, व्याघ्र संरक्षणाच्या अनुषंगाने मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे अध्यक्षतेखाली नियमित बैठक घेण्यात येते.

• क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे मानवी वस्तीजवळ नियमित गस्त घालण्यात येते.

-----------------

## कुही (जि.नागपूर) तालुक्यातील बोरी नाईक परिसरात मुरूम माफियांनी महसूल पथकावर हल्ला चढविल्याबाबत

**(१९) * ३२४९३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील बोरी नाईक परिसरात मुरूम माफियांनी अवैध उत्खननाविरुद्ध कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकावर हल्ला चढविल्याचे दिनांक ५ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकारात महसूल पथकातील नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे यांना चालत्या जेसीबीला लटकवून ३ ते ४ किलोमीटरपर्यंत फरफटत नेण्यात आले आणि त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना ठार मारण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अवैध उत्खननाविरोधात कारवाई करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर मुरूम व वाळू माफियांकडून जीवघेणे हल्ले करण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महसूल पथकावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या भूमाफियांवर कारवाई करण्यासह महसूल अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अवैध उत्खननाविरोधात कारवाई करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर मुरूम व वाळू माफियांकडून जीवघेणे हल्ले काही जिल्ह्यांमध्ये घटना घडलेल्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(४) मौजे. बोरी नाईक, ता. कुही, जि. नागपूर परिसरात मुरूम माफियांनी अवैध उत्खननाविरुद्ध कारवाईसाठी गेलेल्या पथकावर हल्ला चढविल्याने संबंधितांविरुद्ध पोलीस स्टेशन बेलतूर, नागपूर ग्रामीण येथे गु.र.क्र. ०१ ०२/२०२६ भारतीय न्याय संहिता (बी. एन. एस), २०२३- कलम ३०३ (२), ६२, १ ३२, २२१ , १ २१ (१ ), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १ ९६० चे कलम ४८ (७) व ४८ (८), खाण आणि खनिज (नियमन व विकास) अधिनियम, १ ९५७ चे कलम ४ व २१ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १ ९८६ चे कलम १ ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात

आलेला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १ ९६६ च्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही सुरू आहे.

पोलीस अधीक्षक, नागपूर यांनी सर्व ठाणेदार, पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना महसूल पथकांना कारवाई करतेवेळी पथकातील सदस्यांना सुरक्षिततेसाठी शांतता भंग होऊ नये यासाठी व अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पोलीस बळ वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्नच उदभवत नाही.

-----------------

**पुण्यातील कृषी महाविद्यालयातील वॉटर कुलरचा शॉक लागून विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२०) * ३४१५९ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या खाणावळीमध्ये वॉटर कुलरचा शॉक लागून चैतन्य चव्हाण या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असून मृताच्या कुटुंबास देण्यात आलेला १३ लाख रुपयांचा धनादेश न वटल्याचे दिनांक १ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित महाविद्यालय प्रशासनाकडून दिरंगाई केली जात असून बाधित कुटुंबाला न्याय मिळण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्यासह अपघाताची कारणे, सुरक्षिततेतील त्रुटी व नुकसानभरपाई प्रक्रियेतील अनियमितता तसेच मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबास योग्य व तात्काळ आर्थिक मदत व इतर सहाय्य (उदा. नोकरी/शैक्षणिक मदत) देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय,

(२) नाही,

(३) कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याचा कुलरचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला. या विद्यार्थ्याच्या कुटुंबियांस तातडीची मदत म्हणून एकूण रु.३६,८४,४६४/- इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

या प्रकरणी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडून चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या चौकशी अहवालानुसार संबंधितांवर दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

कृषि महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबातील सदस्यांना अनुकंपा तत्त्वावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत प्रचलित नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही. तथापि, विद्यार्थ्याच्या कुटुंबास वेगवेगळ्या माध्यमातून तात्काळ आर्थिक मदत देण्यात आली आहे.

सदर दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषि विद्यापीठांच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांतील वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेबाबत ठोस उपाययोजना करण्यासंदर्भात चारही कृषि विद्यापीठांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राजर्षी शाहू महाराज गुणवंत परदेशी शिष्यवृत्ती योजनेतून ऑस्ट्रेलियातील ‘युनिव्हर्सिटी ऑफ साउथ वेल्स’ या जागतिक विद्यापीठाला वगळण्यात आल्याबाबत**

**(२१) * ३३१५० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज गुणवंत परदेशी शिष्यवृत्ती योजनेतून ऑस्ट्रेलियातील ‘युनिव्हर्सिटी ऑफ साउथ वेल्स’ या जागतिक क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या नामांकित विद्यापीठाला वगळण्यात आले असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक स्तरावर पहिल्या २०० क्रमांकात असणाऱ्या विद्यापीठात प्रवेश घेणे बंधनकारक असताना अशा दर्जेदार विद्यापीठाला योजनेतून वगळल्यामुळे अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधीवर मर्यादा आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून परदेशी विद्यापीठांचे शैक्षणिक शुल्क वेळेवर अदा केले जात नसल्यामुळे अनेक विद्यापीठांनी शासनाला नकार कळविल्यामुळे विद्यार्थ्यांवर फी भरण्याची सक्ती केली जात असल्यामुळे त्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने परदेशातील वाढती महागाई आणि जागतिक युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या दिल्या जाणाऱ्या निर्वाह भत्त्यात वाढ करुन तो वेळेवर देण्याबाबत तसेच भविष्यात ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज यांसारख्या विद्यापीठांनी नकार देऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१).होय, हे खरे आहे.

“द युनिव्हर्सिटी ऑफ न्यु साउथ वेल्स, सीडनी, ऑस्ट्रेलिया” या विद्यापीठाबाबत मागील काही वर्षांपासून विद्यार्थ्यांकडून अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. सदर विद्यापीठ हे Third Party Sponsor स्विकारत नसून विद्यार्थ्यांना व शासनास त्यांचे शिक्षण शुल्क अदा करणेकरीता त्यांचे बँकेचा तपशीलसुध्दा देत नसल्याने तसेच विद्यार्थी व शासनास सहकार्य करीत नसल्याने दिनांक १७ मे, २०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर विद्यापीठ वगळण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही,

अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्याकरीता राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत जागतिक क्रमवारीतील (QS World Ranking) पहिल्या २०० विद्यापीठांपैकी असलेल्या विद्यापीठात किंवा संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी लाभ देण्यात येतो.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर योजनेकरीता दरवर्षी पुरेशी तरतूद केली जात असून वेळेवर निधी वितरीत केला जातो. तसेच ऑक्सफर्ड व केंब्रिज या विद्यापीठांमध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनासुध्दा सदर योजनेचा लाभ देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांची पीक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) * ३३१११ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.किसन वानखेडे (उमरखेड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम),**

**श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.राजेश बकाने (देवळी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः यवतमाळ, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, अमरावती, जालना, चंद्रपूर, वर्धा, धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे गहू, मका, केळी,आंबा, सोयाबीन, कापूस, तूर धान पिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना पीक विमा योजनेतून मदत मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ ते २०२५ या कालावधीत राज्यातील पीक विमा कंपन्यांनी राज्यातील सुमारे ६.२४ कोटी शेतकरी, राज्य शासन व केंद्र शासनाकडून सुमारे ५६ हजार ८०० कोटी रुपयांचा प्रीमियम जमा केला असून त्यापैकी सुमारे ४० हजार ५०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई वितरित करण्यात आली व उर्वरित सुमारे १६ हजार ३०० कोटी रुपयांचा फरक (शिल्लक) राहिल्याचे आणि त्यात प्रशासकीय खर्च व इतर कपाती वजा करता सुमारे २१ ते २८ हजार कोटींचा निव्वळ नफा कमावला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पीक विमा कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात प्रीमियम जमा करूनही अनेक शेतकऱ्यांना वेळेत नुकसानभरपाई मिळत नसल्याचे तसेच कंपन्यांनी प्रशासकीय व पुनर्विमा खर्चाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात नफा कमावल्याच्या तक्रारी समोर येत आहेत तसेच पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजनेत काही सीएससी केंद्र चालकांनी केळीची लागवड नसलेल्या क्षेत्राचा खोटा विमा उतरविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२५-२६ च्या खरीप हंगामात राज्यातील ६८ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असता मा. मुख्यमंत्र्यांनी पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७ हजार रुपयांच्या मदतीची घोषणा केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर योजनेत नुकसान भरपाईसाठी पाच निकषापैकी पीक कापणी प्रयोग हाच एकमेव निकष ठेवण्यात आला असून हवामान आधारित नुकसान, प्रत्यक्ष पंचनामे व शेतकऱ्यांच्या तक्रारींना दुय्यम स्थान देण्यात आले आहे तसेच परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने केलेल्या अभ्यासामध्ये धाराशिव जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेतंर्गत वापरण्यात आलेल्या DSSAT आधारित पीक उत्पादन अंदाजामध्ये व प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीमध्ये गंभीर तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक कापणी प्रयोगांव्यतिरिक्त प्रत्यक्ष नुकसान पंचनामे, हवामान आकडेवारी व शेतकरी तक्रारींचा समावेश करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारच्या विलंबाची परिस्थिती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनंतर्गत खरीप हंगाम २०२५ करिता आतापर्यंत रु. १५७२.८६ कोटी इतकी अंतरिम नुकसान भरपाई निश्चित झाली असून, त्यापैकी रु.११०८.६२ कोटी इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

रब्बी २०२५-२६ हंगामातील नुकसान भरपाईच्या परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत संबंधित जिल्ह्यांमध्ये आंबा पीकाच्या नुकसान भरपाईची परिगणना विमा कंपनी स्तरावर सुरू आहे. केळी पिकाचा विमा संरक्षण कालावधी दिनांक ३१ जुलै, २०२६ पर्यंत असून, त्यानंतर नुकसान भरपाईची परिगणना करणे शक्य होईल.

(२) सन २०१६ ते २०२५-२६ या कालावधीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत राज्यातील विमा कंपन्यांना एकूण रु.५५, ४२६ कोटी इतका विमा हप्ता अदा करण्यात आला आहे. या कालावधीत शेतकऱ्यांना देण्यात आलेली एकूण नुकसान भरपाई रु.३९,९१८.५५ कोटी इतकी आहे.

राज्य शासनाने सन २०२२ पासून विमा कंपन्यांचा नफा एकूण जमा विमा हप्त्याच्या २० टक्क्यांपर्यंत मर्यादित केला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांना एकूण रूपये ६,९४४.११ कोटी इतका निव्वळ नफा झाला असून विमा कंपन्यांनी रुपये ५,५८३.०३ कोटी इतका विमा हप्ता परतावा राज्य शासनास जमा केला आहे.

(३) शेतकऱ्यांना वेळेत नुकसान भरपाई मिळत नसल्याची बाब अंशत: खरी आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या पीक विमा संदर्भातील तक्रारींच्या निराकरणासाठी तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्य स्तरावर तक्रार निवारण समित्या कार्यरत आहेत.

केंद्र शासनाच्या नामतालिकेतील समाविष्ट असलेल्या विमा कंपन्यांमधून निविदा प्रक्रियेद्वारे निवड करून योजनेची अंमलबजावणी निवड झालेल्या विमा कंपनीकडून केली जाते. विमा कंपन्यांचा नफा किंवा तोटा हा त्या वर्षातील एकूण नुकसान भरपाईवर आधारित असतो.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पीक विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी विमा कंपन्यांनी पुनर्विमा (reinsurance) घेण्याची तरतुद आहे. त्यानुसार विमा कंपन्यांकडून कार्यवाही केली जाते.

(४) होय,

तथापि, सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना ही प्रत्यक्ष पीक उत्पादनावर आधारित असल्याने काही महसूल मंडळांमध्ये रुपये ३५,०००/- प्रति हेक्टर पेक्षा जास्त नुकसान भरपाई, तर काही महसूल मंडळामध्ये रुपये १७,०००/- प्रति हेक्टर पेक्षा कमी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.

ही नुकसान भरपाई उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत प्रत्यक्ष उत्पादनात झालेल्या घटीच्या प्रमाणात परिगणीत होते.

(५) व (६) सन २०२४-२५ या वर्षात १ रुपयात पीक विमा योजना लागू होती. त्यामुळे या योजनेचा अयोग्य प्रकारे लाभ घेण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन, मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. परिणामी, या वर्षात पीक विमा घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत, तसेच विमा क्षेत्रात देखील वाढ झाली होती. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा, या हेतूने सन २०२५-२६ पासून "पीक कापणी प्रयोगावर आधारित उत्पादनातील येणाऱ्या घटीच्या आधारे नुकसान भरपाई" देण्याकरिता सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी पारदर्शकरित्या करण्याच्या दृष्टीने तसेच पीक विम्याची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने पीक विमा पोर्टल, शेतकरी ॲप, व्हॉट्सॲप चॅटबॉट, टोल फ्री क्रमांक इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

पीक विमा कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, विभागीय आयुक्त स्तरावर आणि राज्य स्तरावर तक्रार निवारण समित्या कार्यरत आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात वणव्यामुळे दुर्मिळ वनस्पती व वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत**

**(२३) * ३२४४० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ हजार ००८ वणव्याच्या घटनेमुळे वनसंपदेला मोठा फटका बसला असून सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात ७ हजार ०४२ आगीच्या घटना घडल्या आहेत तसेच धामनगाव (विद्यामंदिर) ता.भिवापूर, जि.नागपूर येथे वणव्यामुळे २३ घरे व १९ गोठे जळून राख झाले आहेत तसेच संगमनेर (जि. अहिल्यानगर) तालुक्यात डोंगरावर समाजातील विकृत प्रवृत्तींकडून आगी लावल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पालघर जिल्ह्यातील जंगलांमध्ये मानवनिर्मित वणव्याच्या घटनेत वाढ होत आहे तसेच शिराळा व वाळवा तालुक्यातील डोंगरांना आग लागल्याने जंगलातील जैवविविधता धोक्यात आली असून शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे तसेच शेतमालाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात पानबारा व मोरकारंजा परिसरात वणवे लागून हजारो वृक्ष, दुर्मिळ वनस्पती तसेच शेकडो वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेकडो हेक्टर क्षेत्रातील वनसंपदा नष्ट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, वणवा आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करताना रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे मुर्शी, मौजे निळीक, प्रभानवल्ली, मौजे गाणे-खड्पोली येथे वृद्ध महिलेचा तसेच ठाणे जिल्ह्यातील खेडले येथे वृद्धांचा माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये होरपळून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करून वणव्यास जबाबदार आणि जाणीवपूर्वक वणवे लावणाऱ्यांवर कारवाई करण्यासह वणवे रोखण्यासाठी ड्रोन, सॅटेलाइट देखरेख, ग्रामस्तरीय वनरक्षक दल व जनजागृती करण्याबाबत तसेच वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे होणारे पर्यावरणीय व वन्यजीवांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच रत्नागिरी जिल्हासह संपूर्ण कोकणात वणव्यामुळे होरपळून मृत्यू झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे अशंत: खरे आहे.

भारतीय वन सर्व्हेक्षण यांचेकडून प्राप्त होणारे ॲलर्टस हे सॅटेलाईट वर आधारीत असतात. ज्यामध्ये शेतातील कचरा जाळणे किंवा खाजगी क्षेत्रातील आगीचाही समावेश असतो त्यामुळे सर्वच ॲलर्टस हे वनवणवे नसतात. सन २०२३-२४या वर्षात एूण ५११७ आगीच्या घटना घडलेल्या असून ११५८०.७०७ हे. जळीत क्षेत्र आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली वनवृत्तात माहे जाने ते एप्रिल-२०२६ मध्ये एकुण २०५५ वनगुन्हे नोंद झालेले आहेत. तसेच २२६६.६३७ हे. एवढे क्षेत्र जळालेले आहे.

नागपूर वनविभागातील धामनगांव (विद्यामंदीर) येथे लागलेली आग ही धामणगांव गावाचे लगतचे शेतातील कचरा जाळण्याकरिता शेतकऱ्याने लागलेलया आगीतून पसरली होती. सदरचे गांवात लागलेली आग ही खाजगी शेतामधुन लागलेली असून ती शासकिय वनातून लागलेली नाही.

संगमनेर (जि. अहिल्यानगर) तालुक्यात मौजे मालदाड नियतक्षेत्रामध्ये माहे मार्च ते एप्रिल- २०२६ मध्ये ४.५ हे वनक्षेत्र बाधित झालेबाबत आरोपीवर गुन्हा नोंद केला असुन प्रकरणी पुढील तपास चालु आहे.

(३) पालघर जिल्हयामध्ये मार्च महिन्यामध्ये ९५ आगीच्या घटना होऊन १९३.६२७ हे. जळित क्षेत्र आहे. तसेच शिराळा व वाळवा तालुक्यामध्ये मार्च महिन्यामध्ये आगीच्या १६ घटना घडल्या असुन त्यामध्ये ५९.०४ हे. जळित वनक्षेत्र आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे तसेच शेतमालाचे नुकसान झालेले नाही.

(४) नंदूरबार वनविभागात नवापूर तालुक्यातील चिंचपाडा प्रा. वनक्षेत्रातील पानबारा येथे कक्ष क्र.१०५मध्ये डोंगराच्या कडयावर वणवा लागलेला असून एकूण ८.००हे. क्षेत्र जळालेले आहे. तथापि, हजारो वृक्ष, दुर्मिळ वनस्पती तसेच शेकडो वन्यजीवांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच मौजे मोरकारंजा वनक्षेत्रात वणवा लागलेला नाही.

(५) रत्नागिरी वनक्षेत्रामध्ये लागलेल्या वणव्यामुळे कोणतेही मनुष्य मृत्यू/जखमी झालेले नाही. तथापि, चिपळूण तालुक्यातील मौजे खडपोली गावामध्ये गाणे राजवाडा या भागात एक वृध्द महिला यांचा आग लागल्यामुळे मृत्यू झाला आहे. आग लागलेले ठिकाण हे वनक्षेत्र नसून खाजगी क्षेत्र आहे. तसेच ठाणे वनविभागातील वनपरिक्षेत्र टोकावडे दक्षिण अंतर्गत मौजे खेडले गावालगत आकस्मिक लागलेल्या आगीमुळे एका वृध्दाचा माहे एप्रिल २०२६मध्ये मृत्यू झाला असून सदरची घटना ही वनक्षेत्रातील नसून खाजगी वनक्षेत्रामध्ये घडलेली आहे.

(६) वणव्यास जबाबदार व जाणीवपूर्वक वणवे लावणाऱ्यांवर भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ कायदे/नियमांतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

वनवणवे रोखण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

१. आगीची माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी AI Based Camera चा वापर करुन आग लागलेले क्षेत्र तात्काळ उघडकीस आणण्यास करुन आगीवरती नियंत्रण मिळवण्यात येत आहे.

२. विभागीय स्तरावर कंट्रोल रुम स्थापन करण्यात येऊन आगीबाबतचची माहिती वनकर्मचाऱ्यांपर्यत पोहचवण्यात येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येत आहे.

३. वनपरिक्षेत्र स्तरावर जनजागृती करण्यात येते.

४. वनवणवा सप्ताह साजरा करुन गावामध्ये वनवणवा नियंत्रण व उपाययोजनांचे कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याद्वारे लोकांना आगीपासून होणारे नुकसानीबाबतची माहिती देण्यात येते.

५. वनवणवा प्रतिबंधात्मक भितीपत्रके तयार करुन प्रचार प्रसिध्दी करण्यात येते.

६. नियतक्षेत्र निहाय फायर वॉचरची नेमणूक करण्यात येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यात येत आहे.

रत्नागिरी तसेच ठाणे वनवृत्तामध्ये झालेल्या मृत्यूच्या घटना हया खाजगी क्षेत्रातील असल्याने कुटुंबियांना आर्थिक मदत देता येत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रक्रिया गतिमान करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(२४) * ३६७६४ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जात पडताळणी समित्यांकडे सुमारे ४० हजार प्रकरणे प्रलंबित असून, प्रस्ताव पाठवून तीन महिने होवूनही प्रमाणपत्र मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचे निकाल दिनांक १५ मे पूर्वी जाहीर होणार असताना विज्ञान शाखा व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य असल्याने वेळेत प्रमाणपत्र न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सात जात पडताळणी समित्यांकडे स्वतंत्र अध्यक्ष नसल्याने व काही अधिकाऱ्यांनी सोयीच्या ठिकाणी बदल्या घेतल्यामुळे कामकाजाचा वेग मंदावला असून, त्रुटीची पूर्तता करूनही प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याने विद्यार्थी व पालकांना समिती कार्यालयात वारंवार फेरी मारावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रवेश प्रक्रियेपूर्वी विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे यासाठी तालुकास्तरावर विशेष मोहीम राबवून उक्त रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील नवीन प्रकरणे दर महिन्याला जात पडताळणी समित्यांकडे प्राप्त होतात. माहे एप्रिल, २०२६ अखेर जातपडताळणी संदर्भातील नियमानुसार विहित केलेल्या तीन महिन्यांच्या कालावधीतील एकूण ३५२३३ आणि तीन महिन्यांच्या वरील केवळ ६२८ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.
महासंचालक, बार्टी, पुणे यांनी मासिक आढावा बैठकीदरम्यान सामाईक प्रवेश परिक्षा (CET) अंतर्गत प्रवेशाबाबतची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याबाबत सर्व जिल्हा जात पडताळणी समित्यांना निर्देश दिलेले आहेत.
(३) व (४) अंशत: खरे आहे.
महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी आढावा बैठकीमध्ये जात पडताळणी समित्यांना विशेष मोहिम राबवून त्रुटीयुक्त प्रकरणांची नियमानुसार पुर्तता करुन विहीत वेळेत जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. माहे एप्रिल, २०२६ अखेर तीन महिन्यांच्या वरील केवळ ६२८ प्रकरणे प्रलंबित आहेत.

तसेच, राज्यातील कार्यरत असलेल्या एकूण ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी आठ समित्यांकडील रिक्त अध्यक्ष पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य समितींच्या अध्यक्षांकडे सोपविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अंतर्गत वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत

**(२५) * ३३३७८ श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अंतर्गत महसूल व वन विभागाच्या दिनांक २३ मे, १९८८ रोजीच्या परिपत्रकानुसार जमिनीच्या वाटपासाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये १२,००० निश्चित करण्यात आली असून सद्यस्थितीत ही मर्यादा कालबाह्य ठरल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वार्षिक उत्पन्न मर्यादा अत्यल्प असल्यामुळे सदर अतिरिक्त जमीन भूमिहीन लाभार्थ्यांना वाटप करण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मौजा कुटकी (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील सिलिंग प्रकरण क्र. ४/६०-अ (५) १९७३-७४ अंतर्गत उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांनी दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी १९५.१३ एकर जमीन अतिरिक्त घोषित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बदललेली आर्थिक परिस्थिती, महागाई निर्देशांक व ग्रामीण भागातील उत्पन्नातील वाढ लक्षात घेता महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा पुनर्निर्धारित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भूमिहीन शेतकरी व गरजू कुटुंबांना न्याय मिळावा यासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवून अतिरिक्त घोषित जमिनींचे तातडीने वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील कलम २७, उपकलम (१०) खंड (च) खाली देण्यात आलेल्या स्पष्टीकरणात अतिरिक्त जमिनीच्या वाटपाच्या संदर्भातील पात्रतेसाठी सैनिक, माजी सैनिक आणि त्यांचे अवलंबित यांचेसाठी त्यांना ज्या महिन्यात अतिरिक्त जमिनीचे वाटप करण्यात आले असेल त्या महिन्याच्या पूर्वीच्या महिन्यापासून एक वर्षाच्या कालावधीतील त्यांच्या स्थूल उत्पन्नाची जास्तीत जास्त मर्यादा रुपये ४,५०० ठरविण्यात आली होती. सदर कायद्यात महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, १९८८ अन्वये सुधारित स्थूल उत्पन्न मर्यादा रूपये ४,५०० ऐवजी रुपये १२,००० करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा पुनर्निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा पुनर्निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**राज्यात संभाव्य सुपर एल निनो परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीबाबत**

**(२६) * ३२८७७ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संभाव्य सुपर एल निनो परिस्थितीमुळे उद्भवणाऱ्या दुष्काळ, अतिवृष्टी व उष्णतेच्या लाटेच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी राज्यस्तरीय हवामान आपत्ती मूल्यांकन समिती माहे एप्रिल, २०२६ मध्ये स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एल निनोमुळे राज्यातील पर्जन्यमानात होणाऱ्या संभाव्य तफावतीचा विचार करून कृषी, पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी जलसाठा नियोजनाची तांत्रिक कार्ययोजना कोणती आहे,

(३) असल्यास, वाढत्या तापमानामुळे वीज मागणीत होणारी वाढ लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी व महानिर्मिती यांच्यामार्फत अतिरिक्त वीज निर्मिती व पुरवठ्यासाठी तयार करण्यात आलेली आपत्कालीन योजना कोणती आहे,

(४) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी हवामान-प्रतिरोधक बियाणे, सूक्ष्म सिंचन व पीक विमा योजनांचा विस्तार संभाव्य अन्नधान्य तुटवडा व महागाई लक्षात घेता राज्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्यसाठा वाढविण्यासाठी राबविण्यात येणारी विशेष योजना कोणती आहे,

(५) असल्यास, एल निनोमुळे पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) व जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सुसज्ज करण्यासाठी पुर्वतयारी केली आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भारतीय हवामान विभाग व राज्य शासन यांच्या समन्वयातून जिल्हानिहाय अर्ली वॉर्निंग सिस्टम अधिक सक्षम करण्यासाठी तसेच एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील धरणे, जलाशय व भूजल पातळीचे GIS आधारित डिजिटल मॉनिटरिंग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही,

तथापि, एल निनो प्रभावाच्या परिणामावरील उपाययोजना करण्यासाठी दिनांक २०.०४.२०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली होती. यामध्ये मृद व जलसंधारण विभाग, रोहयो, कृषि, जलसंपदा, नगरविकास, ग्राम विकास, पशुसंवर्धन इ. विभागांना संभाव्य परिणाम विचारात घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ०८.०५.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण विभागाने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जलसंधारण कामांच्या समन्वयासाठी राज्य स्तरीय कृती दल गठीत करण्यात आले आहे.

(२) जलसंधारण विभागाने एल निनोनोच्या पार्श्वभूमीवर जलसाठी नियोजनासाठी जलयुक्त शिवार २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, PMKSY WDC २.० या योजनेमार्फत करण्यात येत आहे.

भारतीय हवामान खात्याने अल-निनों व आयओडी प्रभावाबाबत वर्तविलेल्या अंदाजाच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने शासन पत्र, जलसंपदा विभाग, दिनांक १७.३.२०२६. अन्वये. दिनांक १२.१५.२०२६ पेयजलाचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत नियोजन करण्याच्या अनुषंगाने पाटबंधारे जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्याच्या वापराबाबत मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे. तसेच मान्सूनचा विलंब तसेच पिण्याच्या पाण्याचे प्राधान्य विचारात घेऊन शासन पत्र, जलसंपदा विभाग, दिनांक १३.०६.२०२६ च्या पत्रान्वये धरणांमधून सिंचनासाठी प्रस्तावित किंवा सुरु असलेली पाणी आवर्तने

तात्काळ बंद करण्याबाबत व जलस्त्रोतातील उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना व करावयाची कार्यवाही याबाबत सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) १) (अ) उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे यावर्षी देशात एकूण विजेची परिस्थितीमध्ये कमतरता होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात सुद्धा यावर्षी पर्जन्यमान कमी पडण्याची शक्यता आहे. सदर अंदाजानुसार पुढील काळातही विजेची मागणी वाढण्याची शक्यता आहे.

राज्यात कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा वेगाने विस्तार करत आहे. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्रात १६,००० मे.वॅ. सौर ऊर्जा क्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजने अंतर्गत महावितरण कंपनीकडून ६,१३८ मे.वॅ. क्षमतेचे कार्यादेश देण्यात आले असून ७,००० मे.वॅ. क्षमतेचे विविध सौर प्रकल्पांचे काम करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत एकूण ६५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे सुमारे २५०० मेगावॅट कृषी पंपांना वीज भार राष्ट्रीय पातळीवर दिवसा पुरवठा करणे शक्य झाले आहे.

आगामी काळात अधिकाधिक सौर प्रकल्प कार्यान्वित होत गेल्याने राज्यातील कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्याचे प्रमाण वाढणार असून, परिणामी रात्रीच्या वीज मागणीतील घट होऊन ती मागणी दिवसा स्थलांतरित होण्यास मदत होईल. त्यामुळे पुढील कालावधीत रात्रीच्या वाढलेल्या वीज मागणीची पूर्तता करण्यास मदत होणार आहे.

सदर कालावधीत येणारी अपेक्षित विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरण कंपनीने खालील नियोजन केले आहे:-

१) मध्यम कालीन निविदेद्वारे ९९३ मे.वॅ. इतक्या वीज खरेदीचे करार करण्यात आले आहेत.

२) महावितरणाने करारातील विविध स्रोतांमधून जास्तीत जास्त वीज निर्मिती करून विजेची मागणी पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

३) पुढील ४ महिन्यांमध्ये येणाऱ्या अधिकच्या अपेक्षित विजेच्या मागणीकरिता लघुकालीन निविदेद्वारे १००० मे.वॅ. वीज खरेदी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे व त्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

४) पावसाळ्यात विजेची मागणी कमी असल्याने वीज निर्मिती कंपन्या काही वीज निर्मिती संच देखभालीसाठी बंद करतात. परंतु यावर्षी वीज निर्मिती कंपन्यांना सदर कालावधीत जास्तीत जास्त वीज निर्मिती संच कार्यान्वित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

५) तसेच, गरजेनुसार खुल्या बाजारातून वीज खरेदी करून विजेची मागणी पूर्ण करण्यात येणार आहे

(ब) वाढत्या तापमानामूळे वीज मागणीत होणारी वाढ लक्षात घेऊन महानिर्मितीचे सर्व संच उपलब्ध राहून मागणीप्रमाणे वीज निर्मिती करतील याची काळजी घेतलेली आहे. तसेच सर्व विद्युत केंद्रांसाठी पुरेसा कोळसा साठा उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात आली आहे. वीज संचांची प्रतिबंधात्मक देखभाल करुन संच सुरळीत चालतील यांची काळजी घेण्यात आली आहे.

(४) खरीप हंगाम २०२६ मध्ये भात, खरीप ज्वारी, खरीप बाजरी, मका तूर, मूग, उडीद, भुईमूग, तीळ, सोयाबीन,कापूस व इतर पिकांचे एकूण २०.१६ लाख क्विंटल बियाणे आवश्यक असून एकूण २८.१५ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. एकूण उपलब्ध बियाणांपैकी विविध बियाणे पुरवठादार संस्थांकडे तुलनेने लवकर (कमी पिक कालावधी व कमी पाण्यावर येणारे २.९७ लाख क्विंटल हवामान अनुकूल वाणांचे बियाणे उपलब्ध आहे.

चालू हंगामात आतापर्यंत १.११ लाख शेतकऱ्यांना १.१० लाख हेक्टर क्षेत्रासाठी ठिबक व तुषार एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाणी व्यवस्थापन करणेकरीता ठिबक / तुषार सिंचनाचा अवलंब करण्यावर भर सिंचनाचा लाभ देण्यात आला आहे.

**(५) व (६)** पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने आवश्यक पूर्वतयारी केली आहे. **NDRF व SDRF पथकांचे प्री-पोझिशनिंग** दिनांक १ जुलै २०२६ पासून खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| तपशील | एकूण पथके | प्री-पोझिशनिंग | राखीव |
|---|---|---|---|
| **NDRF** | १८ | १४ | ०४ |
| **SDRF** | ०८ | ०२ | ०६ |
| **एकूण** | **२६** | **१६** | **१०** |

राज्य शासनाने भारतीय हवामान विभागाच्या समन्वयाने जिल्हानिहाय अर्ली वॉर्निंग सिस्टम अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली आहे. **GIS आधारित "SACHET" प्लॅटफॉर्म** चा वापर करून राज्य आपत्ती संचालन केंद्र (SEOC) नागरिकांना त्यांच्या भौगोलिक स्थानानुसार रिअल-टाइममध्ये आपत्तीजन्य इशारे प्रसारित करत आहे.

तसेच, **Geo DSS मॉनिटरिंग पोर्टल** द्वारे पूर, वादळ, विज पडणे इत्यादी आपत्तींसाठी विशेष गरजेनुसार अर्ली वॉर्निंग तयार केली जाते. या प्रणालीमुळे जिल्हानिहाय धोका ओळखून तात्काळ पुर्वसूचना देणे शक्य झाले आहे.

राज्य शासनाने अर्ली वॉर्निंग सिस्टम अधिक सक्षम करण्यासाठी ठोस पावले उचलली असून, भारतीय हवामान विभागासोबत समन्वयाने जिल्हानिहाय पूर्वसूचना प्रणाली कार्यान्वित केली आहे.

-----------------

**राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येत झालेली वाढ**

**(२७) * ३३४३१ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय गुन्हे अहवाल (NCRB) २०२३ नुसार राज्यात अंदाजे ६६६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून विशेषतः मराठवाड्यातील २१७, छत्रपती संभाजीनगर ५३, जालना ४८० व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये १८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ४१५० शेतकरी व २५१९ शेतमजूरांचा समावेश असून त्यात ७७ महिला शेतमजूरांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयात माहे जानेवारी, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीमध्ये २८ भूमीहिन शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून ते मजूरीवर शेती करणारे असल्याने मृत्यूची अधिकृत नोंदणी आत्महत्या म्हणून झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील निसर्गाचा लहरीपणा, वातावरणातील बदल, बियाणे व खतांच्या दरामध्ये वाढ, वाढते कर्ज, अतिवृष्टी, नापिकी, पिकांच्या प्रचंड नुकसानीमुळे कुटुंबावर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणे, हमी भावाचा अभाव, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारातील खरेदीदाराची घट इत्यादी अनेक कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जालना जिल्हयात सन २०२२ मध्ये सर्वाधिक ११४ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची नोंद झाली असून चालू वर्षी पहिल्या तीन महिन्यात १४ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे तसेच सन २०२५ ते २०२६ मधील १४ प्रकरणे अद्यापी प्रशासकीय स्तरावरील चौकशीत अडकल्यामुळे घरातील कर्ता पुरुष गमावलेल्या कुटुंबास वेळेवर आर्थिक मदत मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शेतकऱ्यांना मिळणारी आर्थिक मदत अत्यंत तुटपुंजी असून किमान ५ लाख रुपये व कुटूंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेणे तसेच शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे काय,
(७)असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील शेतकरी व मजुरांच्या आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.
(५) जालना जिल्हयात सन २०२२ मध्ये एकुण ११४ शेतकरी आत्महत्या प्रकरणांची नोंद झाली असुन त्यापैकी पात्र प्रकरणे ९५ व अपात्र प्रकरणे १९ असुन सर्व पात्र प्रकरणात मदत देण्यात आलेली आहे.
माहे जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२६ या तीन महिन्यात एकुण १४ शेतकरी आत्महत्यांची नोंद झालेली आहे सन २०२५ मधील ३ प्रकरणे व जानेवारी, २०२६ ते मे २०२६ या कालावधीतील २९ प्रकरणे अशी एकूण ३२ प्रकरणे असून त्यामधील २१ प्रकरणे पात्र ठरली आहेत. तसेच ११ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असून तालुकास्तरीय समितीकडून संयुक्त चौकशी अहवाल प्राप्त करून घेऊन निर्णयाकरिता जिल्हास्तरीय (शेतकरी आत्महत्या) समितीच्या बैठकीत निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) व (७) I. शासन निर्णय दिनांक २८ एप्रिल, २०१४ अन्वये आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक इत्यादी विविध कारणास्तव नैराश्यग्रस्त शेतकरी व त्याच्या कुटुंबियांचे प्रबोधन करण्यासाठी सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते व तत्सम प्रतिष्ठीत व्यक्तींच्या माध्यमातून शेतकरी व त्याच्या कुटुंबियांचे समुपदेशन करण्याची योजना राबविण्यात येते.
II. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रूपये १ लाख मदत दिली जाते.
III. नैसर्गीक आपत्तीमुळे पिक नुकसान झाल्यास, पीक नुकसानीबाबत मदत देण्यात येते.
IV. कृषी विभागामार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत व नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत आर्थिक सहाय्य ३ टप्यात अदा करण्यात येत आहे.
V. शेतीचा सातबारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नीच्या व वारसांच्या नावावर करणे, महिला व बाल विकास विभागाकडून संपत्तीत वाटा मिळविताना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीस प्राधान्य देणे, घरकुल योजनांमध्ये

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पत्नी व वारसांना प्राधान्यक्रम देणे अशा विविध योजना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांसाठी योजनांचा लाभ देण्यात येतो.

-----------------

**राज्यात खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना लिंकिंग करून मुख्य खतांसोबत अन्य उत्पादने घेण्याची सक्ती केली जात असल्याबाबत**

**(२८) * ३२५८४ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.भीमराव केराम (किनवट), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः पालघर,भंडारा, जालना, लातूर, अहिल्यानगर, रत्नागिरी, गडचिरोली, सोलापूर, सांगली, नागपूर, वाशिम, नांदेड, परभणी येथे रासायनिक खतांच्या दरात मोठी वाढ झाल्याने तसेच कंपन्यांकडून लिंकिंग करून मुख्य खतांसोबत अन्य उत्पादने घेण्याची सक्ती केली जात असल्याने शेतकरी व कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या आर्थिक अडचणीत आले असल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी या धोरणाविरोधात राज्यव्यापी बंद पुकारला असून त्यामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खत व बियाणे पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खत पुरवठ्यातील लिंकिंग पद्धत, विक्रेत्यांचा कमी मार्जिन, FOR पद्धतीने खत पुरवठा, मुदतबाह्य कीटकनाशके परत घेणे तसेच साथी पोर्टलसंदर्भातील अडचणी याबाबत कृषी सेवा केंद्र चालक संघटनांनी शासनाकडे विविध मागण्या सादर केल्या आहेत, हे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या ऊस, कांदा, गहू, हरभरा आदी पिकांसाठी बाजारात खतांची मोठी मागणी असून बाजारात रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे,

तसेच "लिंकिंग" पद्धत थांबविण्यासाठी व पारदर्शक खत वितरण करण्यासाठी राज्य शासनाने उत्तर प्रदेश पद्धतीचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात युरियाचा काळाबाजार आणि साठेबाजी करणाऱ्या ७८६ खत केंद्रांचे परवाने निलंबित केले असून ५५ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द केल्याचे तसेच राज्यातील आठही विभागात ९,९८९ केंद्रांची तपासणी केली असता १,९८० कृषी केंद्रांना 'कारणे दाखवा' नोटिसा बजावण्यात आल्या असून, २५३ ठिकाणी साठेबाजी होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून खताची कृत्रिम टंचाई करणाऱ्या संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्यासह खत दरवाढ व लिंकिंग धोरणामुळे निर्माण झालेली परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी व शेतकऱ्यांना वेळेवर व योग्य दरात खत व बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कृषि निविष्ठा विक्रेत्यांच्या मागण्यासंदर्भात त्यांचे बेमुदत आंदोलन दिनांक २७ एप्रिल २०२६ ते दिनांक २९ एप्रिल २०२६ या कालावधीत झाले होते. कृषि निविष्ठा विक्रेत्यांच्या मागण्यासंदर्भात मा.मंत्री (कृषि) महोदयांच्या अध्यक्षतेखाली ॲग्रो डिलर असो. ची बैठक झाली. सदर बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्यामुळे सदर बेमुदत आंदोलन दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी मागे घेण्यात आले.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खत व बियाणे पुरवठा नियमितपणे सुरु होता.

(४) राज्यात रासायनिक खतांची टंचाई निर्माण झालेली नाही.

लिंकींग पद्धत थांबविण्यासाठी शेतकऱ्यांचा हिताचा विचार करुन उत्तरप्रदेश राज्याने काढलेल्या आदेशाच्या धर्तीवर राज्यामध्ये अनुदानित खतांचे उत्पादक/पुरवठादार कंपन्या यांना अनुदानित खताची विक्री व पुरवठा करणेबाबत देण्यात आलेल्या परवान्यातील अनुदानित रासायनिक खते सोडुन इतर विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके इ. चा पुरवठा व विक्री करण्यास मनाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) व (६) राज्यात युरिया खताच्या अनियमिततेच्या अनुषंगाने दिनांक १५ जुन २०२६ अखेर १२१२४ खत विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली आहे. १९९२ खत विक्रेत्यांना कारणेदाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर ५५ खत केंद्राचे परवाने रद्द करण्यात असुन ८३३ खत विक्रेत्यांचे परवाने निलंबीत करण्यात आले आहेत. तसेच राज्यात युरिया खताच्या अनियमिततेच्या अनुषंगाने २१ ठिकाणी पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यामध्ये राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर एकुण ४४ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. निविष्ठांबाबत येणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचेमार्फत तपासणी करण्यात येते. विक्री केंद्राच्या दर्शनीभागावर साठा प्रदर्शीत करण्या बाबत क्षेत्रीयस्तरावर सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यामध्ये एकुण ४१३३७ कृषि विक्रेता केंद्रावर लिंकींग न करणे बाबत फलकाद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा व राज्यस्तरावर लिंकींग बाबत तक्रार दाखल करणेसाठी नियंत्रण कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या 'फार्मर आयडी' ची तात्काळ नोंदणी करून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्याबाबत

**(२९) * ३२९९२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः अमरावती, ठाणे, गडचिरोली, बीड, आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात शेतकऱ्यांचे "फार्मर आयडी" रखडल्याने शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "फार्मर आयडी" हा शेतकऱ्यांचा ओळख क्रमांक असून यामध्ये जमीन, पीक, बँक खाते आणि योजनांची माहिती एकत्र जोडली जाते, डिलिटल कृषी सेवा आणि ई-गव्हर्नन्ससाठी महत्वाचा आधार असणे तसेच शेतकऱ्यांना बनावट लाभ आणि फसवणूक टाळण्यासाठी मदत होणार असून सदर आयडी अनिवार्य असल्याने सन २०२३ पासूनच्या जमीन फेरफारच्या नोंदी लिंक करण्यासाठी बराच काळ लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यात एप्रिल, २०२६ पर्यंत सुमारे ९५ हजार शेतकऱ्यांनी 'फार्मर आयडी' ची नोंदणी केली नसल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही तसेच बीड जिल्ह्यातील फार्मर आय.डी. काढलेल्या शेतकऱ्यांना एक पेक्षा जास्त शिवारात व एकाच शिवारात पण दोन गटात जमीन क्षेत्र असेल तर पोर्टल मध्ये समाविष्ट होत नाही किंवा दुरूस्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) शासनामार्फत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या खरेदीसाठी "फार्मर आयडी" बंधनकारक करण्यात आले असतानाही शहापूर (जि.ठाणे) येथिल ३४ हजार ७०४ खातेदार शेतकरी असून त्यापैकी २९ हजार ४३२ शेतकऱ्यांना "फार्मर आयडी" मिळाले नाही तसेच शहापुरमध्ये ५ हजार शेतकऱ्यांना फार्मर आयडीअभावी खत मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, गडचिरोली येथील आदिवासी गावांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत असून अमिर्झा परिसरातील अनेक शेतकरी वनहक्क फार्मर आयडी पासून वंचित असल्याने त्यावर तोडगा काढण्याची मागणी स्थानिकांनी मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अमरावती, ठाणे, गडचिरोली, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या 'फार्मर आयडी' ची तात्काळ नोंदणी करून त्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

(२) जमीन फेरफारच्या नोंदी लिंक करण्याची कार्यवाही राष्ट्रीय सूचना केंद्र (NIC), पुणे व मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत सुरु असून जवळपास ८९ टक्के काम पूर्ण झाले आहे.

(३) अमरावती जिल्ह्यातील एकूण खातेदार संख्या ४५६३६० असून एप्रिल २०२६पर्यंत ४२१७१६ शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी केलेली असून उर्वरित ३४६४४ शेतकऱ्यांनी नोंदणी करणे बाकी होती. तसेच बीड जिल्ह्यातील फार्मर आयडी काढलेल्या शेतकऱ्यांना एक पेक्षा जास्त शिवारात व एकाच शिवारात पण दोन गटात जमीन क्षेत्र असेल तर पोर्टल मध्ये Add किंवा दुरुस्त करता येते. जरी एखाद्या शेतकऱ्याची या बाबत अडचण असेल तर ती केंद्राच्या टीम मार्फत सोडवली जाते.

(४) हे अंशतः खरे आहे.

दैनिक सामना मध्ये १९ एप्रिल, २०२६ रोजी "शहापुरात ५००० शेतकऱ्यांकडे फार्मर आयडीच नाहीत" या शीर्षकाखाली बातमी प्रकाशित करण्यात आलेली आहे.

शहापूर तालुक्यात एकूण खातेदार संख्या ३४,७०४ असून यापैकी २९९९७ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, ४७०७ शेतकऱ्यांची नोंदणी शिल्लक आहे. उर्वरित खातेदारांचे फार्मर आयडी काढण्यासाठी गावोगावी महसूल विभागामार्फत कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत व उर्वरित खातेदारांची नोंदणी करून घेण्यात येत आहेत. खतासाठी फार्मर आयडी अद्याप अनिवार्य करण्यात आलेला नाही. सद्यस्थितीत आधार कार्ड लिंक करून खतांचे वाटप सुरु आहे.

(५) दिनांक ३० मार्च २०२६ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना प्राप्त झालेले नाही.

गडचिरोली तालुक्यांतील मौजा-अमिर्झा येथे एकूण १२४ वनहक्क पट्टेधारक आहेत त्यापैकी खाजगी शेती असलेले १११ पट्टेधारक असून त्यांची फॉर्मर आयडी तयार झालेली आहे. अमिर्झा येथे वनहक्क पट्टेधारक असलेले १३लाभार्थी आहेत व त्यांची फार्मर आयडी तयार करण्याचे काम सुरु आहे.

(६) ज्या शेतकऱ्यांनी अद्यापि फार्मर आयडी काढलेले नाही (पी.एम किसान वनपट्टा धारक शेतकऱ्यांसहित) अशा सर्व शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढणेबाबत क्षेत्रीय स्तरावर विविध माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापि फार्मर आयडी काढलेले नाहीत अशा सर्व शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## नाशिक शहरातील ४९ गृहप्रकल्पात विकासकांनी २० टक्के सर्वसमावेशक राखीव क्षेत्र म्हाडास हस्तांतरीत न केल्याबाबत

**(३०) * ३२४७६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील ४९ गृहप्रकल्पात विकासकांनी २० टक्के सर्वसमावेशक राखीव क्षेत्र म्हाडास हस्तांतरीत करावे लागू नये याकरिता विकासकांनी एकाच दिवसात जमिनीचे तुकडे पाडणे, नोंदणी करणे व नकाशे मंजूर करुन मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषी विकासकाविरुध्द कारवाई करण्यासह विक्री केलेल्या २० टक्के क्षेत्राची रक्कम प्रकल्पातून वसूल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नगर विकास विभागाच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसुचनेन्वये निश्चित करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये २०% क्षेत्र म्हाडासाठी राखून ठेवण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले होते. याबाबतची चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गठित समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये ४९ पोटहिस्सा मोजणी प्रकरणांमध्ये नियमानुसार पोटहिस्सा मोजणी न करता भूमी अभिलेख कार्यालयाचे बनावट मोजणी नकाशे यांचा वापर करून शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले होते, हे खरे आहे.

(२) वर नमूद दिनांक ८ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसुचनेनुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांचेसाठी २०% क्षेत्र म्हाडाकडे वर्ग केले जात नसणे याविषयावर दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी विधानसभेमध्ये उपस्थित लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील २० % म्हाडा आरक्षणाच्या अंमलबजावणीत झालेल्या अनियमिततेची सविस्तर चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल, २०२६ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या दिनांक १५ एप्रिल, २०२६ ते १५ जून, २०२६ पर्यंत एकूण ११ बैठका घेण्यात आलेल्या आहेत. महसूल विभाग, भूमि अभिलेख विभाग, नगर रचना विभाग, नाशिक महानगर, पालिका व म्हाडा, नाशिक यांचेकडून सरकारवाडा, पोलिस स्टेशन, नाशिक येथे दिनांक ०७ मार्च, २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ४९ प्रकरणांची तपासणी करण्याकरीता नेमणुक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत तपासणीचे काम सुरू आहे.

सदर तपासणीमध्ये विविध विभागाचे एकूण ३० पेक्षा जास्त कार्यालये आणि १३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे रेकॉर्ड तपासणी करणेची आवश्यकता आहे. सदर तपासणीवेळी एकूण फाईलची संख्या विचारात घेता तसेच १३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे विविध विभागांचे रेकॉर्ड एकत्रित करावे लागत आहे. त्यामुळे अध्यक्ष, चौकशी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सदर चौकशी समितीस अतिरिक्त २ महीने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर चौकशी समितीस चौकशीकरीता अतिरिक्त २ महिने मुदतवाढ शासन निर्णय दिनांक १८ जून, २०२६ अन्वये देण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यात बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याबाबत

**(३१) * ३२७०९ श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अभिमन्यु पवार (औसा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते**

**(नागपूर दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.किसन वानखेडे (उमरखेड), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वनक्षेत्राच्या हद्दीत गत पाच वर्षात सुमारे साडेतीन लाखाहून अधिक बेकायदेशीर वृक्ष तोडीच्या घटना घडल्या असून यात सुमारे १ लाख २४ हजाराहून अधिक वृक्ष सागवानाची असल्याने शासनाचे सुमारे ३० कोटी पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील शिवाना येथील राखीव वन क्षेत्रातील हजारो झाडांची कत्तल करुन लाकूड माफीयांनी जंगल नष्ट केल्याने संबंधितांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबतची मागणी मा. मंत्री, अवर सचिव, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे समर्थन संस्थेने दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(३) तसेच, भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यात (जि. जालना) तसेच तुमसर-देव्हाडी मार्गावर (जि. भंडारा) येथे विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेनगाव वनउपक्षेत्रातून शेजारच्या तेलंगणा राज्यात वन विभागातील अधिकाऱ्यांची संगनमत करून मोठ्या प्रमाणात सागवानाची तस्करी सुरू आहे तसेच पुणे जिल्ह्यातील वनक्षेत्रांमध्ये अवैध वृक्षतोड व जैवविविधतेची हानी होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये, निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, यावल (जि. जळगाव) तालुक्यातील पाडळसे शिवारमधील सुमारे ७६ झाडांची रात्रीच्या वेळी वृक्षतोड झाली असून पेठ (जि. नाशिक) वनपरिक्षेत्रात खैर लाकडाची तोड करुन त्याची तस्करी होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इको सेन्सिटिव्ह गावांच्या संरक्षणासाठी टास्क फोर्स नेमलेले असतांनाही वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमतामुळे राज्यात बेकायदेशीर वृक्षतोड सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास,याप्रकरणी चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुद्ध कारवाई करून बेकायदा वृक्षतोड आणि तस्करी रोखण्यासाठी तसेच तोडण्यात आलेल्या वृक्षाच्या बदल्यात पुनर्लागवड करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे , नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

(२) छत्रपती संभाजीनगर वनविभागात मौजे शिवना या गावात कोणतेही राखीव, संरक्षित, अवर्गीकृत वनक्षेत्र नाही. तसेच शिवना येथे झाडांची कत्तल झालेली नाही. समर्थन संस्थेने दिलेले निवेदन प्राप्त झालेले असून सदर निवेदनावर वनपरिक्षेत्र अधिकारी, अजिंठा तसेच सहायक वनसंरक्षक, सिल्लोड यांनी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मौजे शिवना या गावात कोणतेही राखीव, संरक्षित, अवर्गीकृत वनक्षेत्र नाही. तसेच शिवना येथे झाडांची कत्तल झालेली नाही.

(३) छत्रपती संभाजीनगर वनविभागातंर्गत भोकरदन व जाफ्राबाद या दोन्ही गावात कोणतेही राखीव, संरक्षित व अवर्गीकृत वनक्षेत्र नाही. सदरील दोन्ही तालुक्यात विना परवाना वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच तुमसर ते देव्हाडी रस्त्यालगतच्या गटधारक यांनी शेतीचा हंगाम सुरु झाल्याने खाजगी शेतातील जळाऊ करीता

बाभुळ प्रजातीचे लहान झुडपे तोड करुन शेतीची सफाई केलेली आहे व ती बाभुळ झाडे अनुसूचीमध्ये येत नाही. बाभूळ झाडांना वाहतूकीस सुट देण्यात आलेली आहे.

(४) मध्य चांदा वनविभागामधील जिवती वनपरिक्षेत्रातील शेणगांव उपक्षेत्रातून सागवानाची अवैध तस्करी करणाऱ्यांवर गुन्हा नोंदवुन सदर गुन्हयामध्ये दोन आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे.

तसेच पुणे जिल्हयातील जुन्नर वनविभागामध्ये मौजे काठापूर बुद्रुक व मौजे शिंगवे या दोन गांवातील वनक्षेत्रामध्ये खैर या प्रजातीच्या ६१ वृक्षांची तोड निदर्शनास आलेली असुन त्याप्रकरणी वनगुन्हे दाखल करुन प्रकरणी तपासाची कार्यवाही सुरु आहे.

(५) यावल वनविभागातील पाडळसा शिवारातील मालकीमध्ये ३० झाडांची तोड करण्यात आली असून जप्त करण्यात आलेला माल वन आगारात जमा करण्यात आला आहे. त्यासंबंधी आरोपींकडून नियमानुसार रु.३०,०००/- रकमेचा दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच नाशिक वनवृत्तातील पेठ वनपरिक्षेत्राअंतर्गत ४ अवैध वृक्षतोडीच्या गुन्हयाची नोंद करण्यात आली असून माल जप्त करण्यात आलेला आहे. त्यामध्ये खैर प्रजातीची तोड/तस्करी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(६) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२ मार्च २०२४ रोजीच्या आदेशानुसार सावंतवाडी-दोडामार्ग कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी सावंतवाडी-दोडामार्ग टास्क फोर्स तयार करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समितीची स्थापना दिनांक २७ जुन, २०२४ रोजी करण्यात आली. सिंधुदुर्ग वनविभागामध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने वृक्षतोड होत असल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(७) टास्क फोर्स यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीमध्ये रु.२.९१ लाख रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात आलेली आहे. तसेच ८२० वृक्षाची पुर्नलागवड करण्यात आलेली असून प्रलंबित १३ प्रकरणाची पुर्नलागवड २०२६च्या पावसाळयात करण्यात येणार आहेत.

-----------------

## राज्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची विशेष पदभरती प्रलंबित असल्याबाबत.

**(३२) * ३४३७२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या सन २०१७ मधील निर्णयानुसार आदिवासी समाजाची राखीव रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यानुसार राज्यात एकूण १२ हजार ५०० पदांची विशेष पदभरती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ७ वर्षांत सुमारे ६ हजार ८१० पदे रिक्त करण्यात आली असून केवळ १ हजार ३४३ पदांचीच भरती पूर्ण झाली आहे उर्वरित सुमारे ११ हजारांहून अधिक पदांची भरती अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागाद्वारे राज्यातील आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागांवर निवड झालेल्या परंतु आदिवासी प्रमाणपत्र सादर करू न शकलेले सदर अधिकारी, कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करून रिक्त झालेल्या जागांवर आदिवासी समाजातील तरुणांसाठी विशेष पदभरती घेऊन गट ‘क’ व गट ‘ड’ची पदे दिनांक ३१ जुलै, २०२३ पर्यंत भरण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी तरुणांनी वारंवार पाठपुरवठा करून देखील सदर विशेष भरती प्रक्रिया रखडली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून उर्वरित ११ हजार २२७ पदांची भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)नाही, हे खरे नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका ८९२८/२०१५ (चेअरमन, फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (FCI) वि. जगदिश बलाराम बहिरा या याचिकेमध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ५ जून, २०१८ अन्वये मा. मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्याची तरतूद करण्यात आली होती. या शासन निर्णया विरुध्द मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे आदिवासी हक्क समितीने रिट याचिका ३१४०/२०१८ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये शासनाच्या वतीने दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये विविध प्रशासकीय विभागांनी सादर केलेल्या माहितीनुसार शासन सेवेत दिनांक १५ जून, १९९५ ते ३१ ऑगस्ट, २०१५ या कालावधीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्त झालेले तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेले १२५२० कर्मचारी असल्याचे नमूद करण्यात आले होते.

(२) मात्र, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१९ मधील निर्देशाप्रमाणे प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करुन सादर केलेल्या माहितीनुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या तथापि, जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्याने/सादर करु न शकल्याने अधिसंख्य पदावर वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रत्यक्षात ६८६० असल्याचे निदर्शनास आले आहे व त्यापैकी १५१४ पदे भरण्यात आली आहेत.

(३) होय. हे खरे आहे.

(४) व (५) अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने/सादर करु न शकलेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१९ अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातून पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या असून नियमित पदभरतीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(३३) * ३५४९१ श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील छत्रपती संभाजीनगर, अमरावती, पालघर, धाराशिव, अहिल्यानगर आणि नागपूर या सहा जिल्ह्यांतील ४८ ग्रामपंचायतींमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) मोठ्या प्रमाणावर

आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च २०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'कॅगच्या' अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील गेवराई (कुबेर) येथे १५६ दिवसांऐवजी १८६ दिवसांची मजुरी दाखवून एकाच कुटुंबप्रमुखाच्या नावाने अनेक 'दुबार जॉब कार्ड्स' तयार करणे आणि हस्तलिखित व संगणकीय हजेरीपटात तफावत दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपळखुटामधील रस्त्यांच्या कामात गवत काढून २३.६१ लाखांचा गैरव्यवहार करण्यात आलाआहे, तसेच धाराशिव जिल्ह्यातील शेळका-धानोरा येथे रेशीम शेतीच्या नावाने प्रत्यक्षात कोणतेही काम न करता शासकीय निधीचा अपव्यय व नियमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील इटकी शिवार (बु.), हिंगणी आणि मिर्झापूर या ग्रामपंचायतींमध्ये १०२ मजुरांच्या नावे अतिरिक्त मजुरी काढणे व पालघरमधील येती वरोटी येथे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करून निधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अशा प्रकारचा गैरव्यवहार रोखण्यासाठी व कामात पारदर्शकता आणण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) अमरावती जिल्ह्यातील इटकी शिवार (बु.), हिंगणी आणि मिर्झापूर या ग्रामपंचायतींमधील मिर्झापूर प्रकरणी संबंधीत दोषींवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या "बल्क ग्राहक" डिझेल वर्गीकरणात बदल करणेबाबत

**(३४) * ३३१२२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील जिल्हयांतील मच्छिमार मत्स्य व्यवसायावर अवलंबून असून त्यांच्या उदरनिर्वाहाचे मच्छिमारी मुख्य साधन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना "बल्क ग्राहक" म्हणून वर्गीकृत केल्याने त्यांना उच्च दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उरण (जि. रायगड) तालुक्यातील मोरा व करंजा बंदरातील पर्ससीन नेट आणि खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या सुमारे ३०० बोटींना दररोज हजारो लिटर डिझेल लागत असून उक्त डिझेल दरात महिन्याभरात झालेल्या ५१ रुपयाच्या वाढीव दरामुळे फेरी मागे लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च मच्छीमारांवर पडत असल्यामुळे तीनशे बोटी बंदरातच उभ्या असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मच्छीमार संस्थांचा अजूनही होलसेल (बल्क) कॅटेगिरीतच समावेश असल्याने खुल्या बाजारातून डिझेल घ्यावे लागत असून त्यांना शासनाची २१% सवलतही मिळत नसल्यामुळे डिझेल दरवाढ व सवलतींचा अभाव यामुळे लघु व पारंपारिक मच्छिमारांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून त्यांच्या दैनंदिन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना डिझेल दरात सवलत देऊन उक्त मच्छिमारांना संरक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थाना पुरवठा करण्यात येणारा डिझेल हा घाऊक दर (Bulk rates) या प्रवर्गातुन करण्यात येत आहे.

मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या अमेरिका व इराण युध्दाच्या पाश्वभुमीवर निर्माण झालेला इंधन तुटवड्यामुळे देशामध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये डिझेलचे घाऊक दर (Bulk rates) किरकोळ दरांपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक झालेले आहेत. याचा काही अंशी परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला आहे.

(४) डिझेल दर वाढ झालेली असल्यामुळे उपजीविकेचे प्राथमिक साधन असलेल्या मच्छिमारांवर इंधनाच्या वाढीव खर्चाचा बोजा पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदरची दर वाढ झालेली असल्यामुळे याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला असल्याने सदरची दर वाढ कमी करण्याबाबत मच्छिमार सहकारी संस्था यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आलेली आहेत.

(५) राज्यातील मच्छिमारांना आवश्यक असलेले डिझेल हे किरकोळ दर या प्रवर्गातुन पुरवठा होण्याबाबत शासनाने दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये मा. केंद्रिय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना कळविलेले आहे. सदरची बाब ही केंद्र शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मुद्रांक शुल्क कार्यालयांचे खाजगीकरण आणि वाढीव शुल्काचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(३५) * ३२६४३ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६० मुद्रांक शुल्क आणि नोंदणी कार्यालयांचे व्यवस्थापन 'व्हीएफएस ग्लोबल' या खाजगी कंपनीकडे सोपविले असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रत्येक दस्तऐवज नोंदणीसाठी ५,२१८ रुपये अतिरिक्त शुल्क द्यावे लागणार असून विभागाची गोपनीयता संपुष्टात येत असतानाच नागरिकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, ठाणे व पुणे यांसारख्या शहरांतील नागरिकांवर पडणारा हा आर्थिक भार कमी करण्यासाठी शुल्कात कपात करून खाजगीकरणाचा निर्णय पूर्णतः रद्द करून शासनातर्फे स्वतःच्या निधीतून कार्यालयांचा विकास करण्यात यावा अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील त्रुटी दूर करण्याबाबत**

**(३६) * ३३२०५ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) ग्रामीण कुटुंबांना १०० दिवस रोजगाराची हमी असताना प्रत्यक्षात केवळ ८ टक्के कुटुंबांना रोजगार दिल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियंत्रक व महालेखा परीक्षकाच्या (कॅग) अहवालात राज्यातील मनरेगा अंमलबजावणीत वित्तीय व्यवस्थापन, कामांची अंमलबजावणी व सामाजिक लेखापरीक्षणात गंभीर त्रुटी आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील मंजूर २५.७२ लाख कामांपैकी मोठ्या प्रमाणात कामे अपूर्ण असून काही कामे सुरूच न झाल्याने रोजगार निर्मितीवर गंभीर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये ग्राम रोजगार सहाय्यकांची नियुक्ती न झाल्याने मनरेगा योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जॉब कार्ड व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात अनियमितता असून, नोंदी अद्ययावत नसणे तसेच एकाच व्यक्तीच्या नावाने एकापेक्षा अधिक जॉब कार्ड असणे अशा त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील अनियमिततेबाबत संबंधित दोषीं अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह योजनेतील त्रुटी दूर करून पारदर्शक अंमलबजावणी करणे, रोजगार हमीची अपूर्ण कामे तात्काळ सुरु करणे तसेच ग्राम रोजगार सहाय्यकांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता नियंत्रक व महालेखा परीक्षक (कॅग) यांनी त्यांच्या अहवालात काही बाबी नमुद करुन सदर बाबींकरीता सुधारात्मक उपायांसह शिफारसी केल्या आहेत.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
(६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची पारदर्शक अंमलबजाणी सुरू असुन मजूरांच्या कामाच्या मागणीनुसार अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येत असुन आवश्यकतेनुसार नवीन कामे देखील सुरू करण्यात येत आहेत. राज्यातील २८,३१० ग्रामपंचायतींमध्ये सुमारे २७,१३५ ग्रामरोजगार सेवक कार्यरत असुन ग्रामरोजगार सेवकांच्या नियुक्तीचे अधिकार संबंधित ग्रामसभेला प्रदान करण्यात आले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ७/१२ उताऱ्यांमध्ये बेकायदेशीररित्या फेरफार करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत**

**(३७) * ३२४४१ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री. हारून खान (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल विभागामध्ये शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम १५५ चा गैरवापर करून ७/१२ उताऱ्यांमध्ये नावे, क्षेत्रफळ बदल तसेच विविध प्रकारचे शेरे विनापरवाना नोंदविण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर फेरफार करुन सुमारे एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित शेतकऱ्यांची बेकायदेशीररित्या जमिनीच्या नोंदीमध्ये बदल करुन जमीन हस्तांतरण करण्यात आल्यामुळे त्याचा मालकी हक्कांवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल खात्यातील मोठा गैरव्यवहार असून पुणे विभागात सुमारे ३८ हजार २७ प्रकरणापैकी २ हजार ३८३ प्रकरणांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये १५ अधिकारी गंभीर, ८२ अधिकारी गंभीर, व ५५ अधिकारी मध्यम स्वरुपाच्या अनियमिततेत दोषी आढळले आहेत असे एकूण प्राथमिक तपासात १५२ अधिकारी दोषी आढळले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये गत पाच वर्षांतील कलम १५५ अंतर्गत आदेशांची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत काय तसेच यासाठी स्वतंत्र राज्यस्तरीय देखरेख यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील संशयित फेरफार नोंदी रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मूळ नोंदी पुनर्स्थापित करणे तसेच भविष्यात अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी ऑनलाइन महसूल प्रणाली अधिक सुरक्षित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ,(२) व (३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९ मे, २०२५ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हयातील मागील ५ वर्षामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ , १८२ व २२० अन्वये निर्गमित केलेल्या आदेशांची व निर्णयांची चौकशी करण्याबाबत समिती गठित करण्यात आली आहे.

सदर समितीने दिनांक १३ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये चौकशी केलेल्या प्रकरणांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील मागील ५ वर्षामधील कलम १५५ ची ३८०२७ प्रकरणे तपासणीसाठी सादर करण्यात आली. त्यापैकी पूर्ण कागदपत्र प्राप्त झालेल्या २३३७ प्रकरणांपैकी समितीला एकूण ४२४ प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आले. या प्रकरणांचे अनियमिततेच्या स्वरुपानुसार "अ" अतिगंभीर, "ब" गंभीर व "क" किरकोळ अशी ३ प्रकरात वर्गवारी केली आहे. "अ"अतिगंभीर वर्गवारीत १३ प्रकरणे, "ब" गंभीर मध्ये २४७ मध्ये व "क" किरकोळ वर्गवारीत १६४ अशा एकूण ४२४ प्रकरणांमध्ये बेकायदेशीर कार्यपध्दतीचा अवलंब करून आदेश पारित करण्यात आल्याचे दिसून आले आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांनी केलेल्या छानणीअंती सर्व "अ, ब व क" वर्गवारीतील प्रकरणांमध्ये एकूण १३१ अधिकारी/कर्मचारी संबंधित असल्याचे दिसून येत आहे.

सबब, एकूण ४२४ प्रकरणांमध्ये संबंधित शेतक-यांच्या जमिनींच्या अधिकार अभिलेख गाव नमुना क्र. ७/१२ मध्ये नावांमध्ये बदल, क्षेत्रांमध्ये बदल अथवा धारणाधिकारामध्ये बदल झालेला दिसून येत आहे.

(४) शासन पत्र दिनांक १० मार्च, २०२६ अन्वये "महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५, १८२ ,२२० व २५७" अन्वये मागील ५ वर्षापूर्वी (माहे फेब्रुवारी, २०२१ पासून) क्षेत्रीय महसूल अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयांची किंवा निर्गमित केलेल्या आदेशांची चौकशी करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(५) व (६) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालातील शिफारशीनुसार अनियमितता झालेल्या प्रकरणांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या विचारात घेता, पुणे जिल्हयातील किंवा विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत: तपासून त्याला आवश्यकतेनुसार पुनर्विलोकनात घेणे व सदोष आढळून आलेली सर्व प्रकरणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम २५७ नुसार पुनरिक्षणात घेणे तसेच पुनरिक्षण करण्याच्या निर्णय घेण्याच्या तारखेपर्यंत जी प्रकरणे ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेली असतील अशी उर्वरित प्रकरणे शासनाच्या पूर्वमान्यतेने पुररिक्षणात घेण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना शासन पत्र दिनांक १० मार्च, २०२६ अन्वये कळविण्यात आले आहे.

त्यानुसार जिल्हाधिकारी,पुणे यांच्या दिनांक २७ मार्च, २०२६ आदेशान्वये सदोष आढळून आलेली सर्व प्रकरणे म.ज.म.अ. १९६६ चे कलम २५७ नुसार पुनरीक्षणात घेणेकामी सर्व उपविभागीय अधिकारी यांना कळविणेत आले असून याबाबतची कार्यवाही उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.

'अ' (अतिगंभीर) प्रवर्गातील १३ प्रकरणांत दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशीसोबतच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची समितीने शिफारश केली आहे. तथापि, याबाबतची कार्यवाही करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार, दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांना स्वतःची बाजू मांडण्यासाठी विभागीय आयुक्त (पुणे) यांच्यामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे स्पष्टीकरण/म्हणणे मागवावे व त्यावर अभिप्राय नोंदवून अंतिम अहवाल शासनास सादर करावा, असे विभागीय आयुक्त, पुणे यांना दिनांक ०७ एप्रिल, २०२६ रोजी निर्देश देण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त यांनी अहवाल सादर केल्यानंतर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे शासन स्तरावर नियोजित आहे. सद्यस्थितीत अ" अतिगंभीर गटातील १३ प्रकरणांमध्ये जबाबदार असणाऱ्या १५ अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिनांक २५ मार्च, २०२६ रोजीपासून तातडीने सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि. नाशिक) शहरात शासकीय जमिनीवर अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्या तस्करांनी तलाठयावर केलेला प्राणघातक हल्ला

**(३८) * ३२९२५ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि. नाशिक) शहराला लागून असलेल्या सायने बुद्रुक शिवारात शासकीय जमिनीवर होणारे अवैध गौण खनिज चोरी व अवैध ब्लास्टिंग रोखण्यासाठी गेलेल्या तलाठ्याच्या अंगावर ट्रॅक्टर घालुन चिरडण्याचा प्रयत्न माहे मे, २०२६ मध्ये केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात शासकीय जमिनीवर अवैध ब्लास्टिंग व गौण खनिज चोरी बऱ्याच वर्षापासून सुरू असल्याने गौण खनिज आणि महसूल व खनिकर्म विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह महसूल अधिकाऱ्यावर वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर तलाठी व महसूल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष पथके स्थापन करण्याबाबत व आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ८ मे, २०२६ रोजी मौजे सायने बुद्रुक येथील तलाठी श्री गोविंद मारुती तिडके हे त्यांचे सहकारी तलाठी श्री. मनोज खरोटे व श्री. किशोर थोरात यांच्यासह शासकीय कार्यक्रमासाठी जात असताना प्रवासादरम्यान, सायने बु शिवारातील शासकीय मालकीच्या ग.नं. २७५ राखीव वनामध्ये एक विना क्रमांकाचा महिंद्रा ट्रॅक्टर ब्लास्टिंगद्वारे अवैध गौण खनिज उत्खनन करताना आढळल्याने चौकशी केली असता, ट्रॅक्टर मालक श्री.पुरभाजी रामदास गायकवाड याने शासकीय कामात अडथळा आणून चालकाला चिथावणी दिली व ट्रॅक्टरचालक श्री.पवनकुमार हुसेन आप्पा याने ट्रॅक्टर तलाठी श्री गोविंद तिडके यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला व चालू ट्रॅक्टरसह फरफटत नेले. या गंभीर कृत्यामुळे श्री.तिडके यांच्या उजव्या हातास आणि दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली आहे. सदर घटनेबाबतची मालेगाव तालुका पोलीस ठाण्यामध्ये FIR क्र.०४०८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण यांना संबंधितावर तात्काळ अटक करुन दोषारोप पत्र तात्काळ दाखल करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच तहसीलदार मालेगाव यांनी याप्रकरणी दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

तसेच सदर घटनेपूर्वी अन्य प्रकरणी मौजे सायने बु येथुन अवैध मुरुम उत्खनन बाबत कारवाई करुन सुजल प्रभाकर सोनवणे यांचेकडुन रु.१,०८,८८८/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करून शासन जमा करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालेगाव तालुक्यात गेल्या दोन वर्षात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये ३९ कारवाया करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये रक्कम रु.५०,०१,२५२/- एवढी दंडाची आकारणी केलेली आहे. तसेच १० फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच गौण खनिजांचे अनिधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणी विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक ११ जुलै, २०२५ च्या परिपत्रकान्वये सूचना क्षेत्रीय यंत्रणेला निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साखरीनाटे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील मच्छिमार जेट्टीच्या निकृष्ट बांधकामाबाबत**

**(३९)** * **३२४४४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरीनाटे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या मच्छिमार जेट्टीचे ८ ते १० पिलर चिखलात खचल्याचे तसेच सुरुवातीला टाकलेल्या भरावालाही मोठ्या भेगा पडल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीच्या टप्प्यातच पिलर खचल्यामुळे बांधकामाचा दर्जा व गुणवत्तेवर त्याचा परिणाम झाला असून अनेकदा तक्रारी करूनही संबंधित अधिकारी किंवा कंत्राटदार कामाच्या दर्जाकडे लक्ष देत नसल्याचे आरोप स्थानिक ग्रामस्थ व मच्छिमार यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कामाची उच्चस्तरीय चौकशी करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच कामाच्या दर्जाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

साखरीनाटे ता.राजापूर येथील मत्स्यबंदर प्रकल्पाच्या क्वेवॉलचे काम प्रगतीत असताना क्वेवॉलच्या मागील बाजूस ड्रेजिंग करुन भरावाचे काम सुद्धा प्रगतीपथावर होते. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी भौगोलिक रचनेनुसार भरतीच्या वेळी पाण्याबरोबर वाहून येणारा पालापाचोळा व इतर गाळ हा या ठिकाणी वर्षानुवर्षे साचून राहिला असल्यामुळे, या विशिष्ट भागातील जमिनीची धारणा क्षमता (bearing capacity) ही शुन्य आहे, ही बाब अतिशय दुर्मिळ आहे. या ठिकाणच्या जमिनीची bearing capacity वाढविणे आवश्यक आहे. याबाबत आय.आय.टी. मुंबई यांनी या ठिकाणी Perforated Vertical Drain (PVD) प्रणालीचा अवलंब करण्याबाबत स्थळपाहणी अहवालानुसार सुचविले आहे.

साखरीनाटे ता.राजापूर येथील मत्स्यबंदराच्या ठिकाणी ० ते १८ मी. पर्यंत दलदल असल्याने, व पाईलच्या भोवतालचा passive support खाडीच्या बाजूने कमी झाल्याने, भरावाचा भार हा पाईल वर आल्याने ७ पाईल्स झुकल्या आहेत. याकरिता आय.आय.टी.मुंबई यांचेकडून स्थळ पाहणी अहवाल घेण्यात आलेला असून, या अहवालानुसार Perforated Vertical Drain (PVD) चे काम प्रगतीपथावर आहे. झुकलेल्या पाईल्सचे काम कंत्राटदार स्वःखर्चाने करणार आहे. यापुढे अशा बाबी उद्भवणार नाहीत याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**      **जितेंद्र भोळे**
**मुंबई.**      **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.